# प्रकरण - ४

## `स्मृतिचित्रे` तील व्यक्तिचित्रण

## प्रकरण - ४

## `स्मृतिचित्रां`तील व्यक्तिचित्रण

### १. लक्ष्मीबाआींचे `स्व` भावचित्र.

`स्मृतिचित्रे` ही अेक अत्यंत श्रेष्ठ दर्जाची कलाकृती असून लक्ष्मीबाआींनी रेखाटलेली असामान्य व विविध व्यक्तिचित्रे हे `स्मृतिचित्रां`च्या वाङ्‌मयीन थोरवीचे अेक प्रमुख अंग आहे. त्यात टिळकांच्या व्यक्तिचित्राला मध्यवर्ती स्थान असले तरी स्वत: लक्ष्मीबाआी, त्यांचे कुटुंबीय, आप्त-स्वकीय यांची व्यक्तिचित्रणेही `स्मृतिचित्रां`त अत्यंत आकर्षक अशी अुतरली आहेत. स्वत:चे व्यक्तिचित्रण त्यांनी जाणीवपूर्वक न करता अगदी सहजगत्या केले आहे. आपल्या जीवनाचा पट त्यांनी वाचकापुढे अगदी प्रांजलपणे अुलगडून दाखविला आहे, व त्यातूनच त्यांचे व्यक्तिमत्व प्रतिबिंबित झाले आहे. आतले अेक व बाहेरचे अेक असा त्यांचा स्वभाव नसल्यामुळे व त्यांची स्मरणशक्ती अगदी तल्लख असल्यामुळे त्यांनी घडलेले सर्व घटना-प्रसंग जसे घडले तसे रेखाटले आहेत.

लहानपणापासून लक्ष्मीबाआी त्यांच्या आत्याच्याच- रखमाबाआी गोविंद सांबरे यांच्या घरी वाढल्या. त्यांच्या वडिलांना- नानांना सोवळे झाले होते व त्यामुळे घरातील सर्व व्यक्तींना खूप त्रास सहन करावा लागे. अेकदा त्या चोरून पेरू खाताना आढळल्या व नानांनी त्यांना खूप चोप दिला, हे त्या प्रामाणिकपणे सांगतात. नानांची खोडकी जिरविण्यासाठी त्या गंगेत जीव देण्याचा प्रयत्न

अयशस्वी होतो. लक्ष्मीबाअी प्रामाणिकपणे व मिस्किलपणे सांगतात, ` नानांची खोड मोडली नाही, पण माझी मात्र पुरी खोड मोडली. ` [१]

बाहुल्यांचा खेळ लक्ष्मीबाअींना विशेष प्रिय होता. हा खेळ खेळण्यासाठी त्या आपल्या सखू नावाच्या मैत्रिणीच्या घरी दररोज जात. पण अेके दिवशी तिच्या मावाने हातात काठी घेअून त्यांचा मार्ग आडवला व ` खबरदार आमच्या घरात आलीस तर ! तंगडीच मोडीन ! ` [२] असा दम दिला. पण योगायोगाने त्याच्याशीच लग्न होअून सर्व आयुष्य लक्ष्मीबाअींना त्याच्याबरोबर कंठावे लागले. टिळकांना आपण कसे पसंत पडलो याचे त्यांना आश्चर्य वाटते. त्या प्रांजलपणे म्हणतात, ` मला नवल वाटते मी टिळकांना कशी पसंत पडले ह्याचे. माझे रूप, रंग अगदी बेताचेच होते, बाकी नाक डोळे जरी रेखीव नव्हते तरी ते होते व अगदी जागच्या जागी होते. ` [३] स्वत:च्या रूपाबद्दल विनोदप्रचुरही त्या लिहितात. स्वत:कडे पाहण्याची अलिप्त व काहीशी व्रात्य अशी वृत्ती असल्याने स्वत:च्या फजितीचे वर्णन करणे, स्वत:च्या चुका कबूल करणे, आपल्या अज्ञानाबद्दल अुपहासाने लिहिणे हे लक्ष्मीबाअी सहजपणे करू शकतात.

लग्न झाल्यावरही बाहुल्यांचा खेळ खेळायची त्यांची हौस कमी झाली नाही. भिकूताअींकडे रहात असताना या बाहुलीच्या खेळामुळे भिकूताअींना व शेजा-यापाजा-यांना खूप खर्च करावा लागला. शेवटी ` तू सोळा वर्षांची झालीस तरी बाहुल्या खेळतेस ` [४] अशी बोलणी त्यांना पेंडशांच्या घरी खावी लागली. अशा प्रसंगातून ` प्रौढत्वी निज शैशवास जपणा-या ` व अुत्सव-समारंभप्रिय अशा लक्ष्मीबाअींचे आपणास दर्शन होते.

लक्ष्मीबाअी अत्यंत सोशीक व सहनशील होत्या. बालपणी त्यांना अनेकदा मार खावा लागला व पुढे लग्न झाल्यावर सासरी त्यांना शब्दांचा मार खावा लागला. मामंजींच्या अंगात आलेल्या देवीने घरात आलेली सून वाअीट पायाची

आहे, असे त्यांना सांगितल्यावर मामंजी त्यांच्याशी नीट वागेनासे झाले. टिळकही रागावून घर सोडून पळून जात. अशावेळी लक्ष्मीबाअींना पैठणी, पातळे विकण्याची वेळ येअी, पण लक्ष्मीबाअी हे सर्व निमूटपणे सहन करीत.

मुरबाडला असताना वामनराव पैठणीसाठी लक्ष्मीबाअींना खूप टोचून बोलत. त्यांच्या साड्या फाटल्या होत्या व त्यांना पुण्याच्या बांगड्या भरावयाच्या होत्या पण `पैठणी आणून द्या, मग बांगड्या भरन... पैठणी आणून द्या मग लुगडी घेअू`[५] अशी त्यांची भाषा असे. लक्ष्मीबाअींना कोकणी पदार्थ करता येत नसत. `पेजबुड्या भात` किंवा `जिवंत फोडणी` या गोष्टी त्यांना माहित नव्हत्या. अेकदा आमटीला जिवंत फोडणी देण्यास वामनरावांनी त्यांना सांगितले व अर्थातच ते लक्ष्मीबाअींना जमले नाही. तेव्हा, `तू दगड झाली असतीस तर तुझा पायखान्याच्या पायरीला अुपयोग झाला असता`[६] असे अनुदार अुद्गार त्यांनी काढले व लक्ष्मीबाअींनी मूकपणे ते सहन केले. वामनरावांच्या देवपूजेची अुपकरणी घासली तरी त्यावर डाग रहायचे. त्याबद्दलही त्यांना खूप बोलणी खावी लागत. अितका सासुरवास सहन करूनही लक्ष्मीबाअींनी आपल्या सासऱ्याबद्दल तिरस्काराची भावना कोठेही व्यक्त केली नाही. अुलट त्या म्हणतात, `मामंजी मला छळीत, पण दोन गोष्टींबद्दल मला त्यांचे गुण घ्यावेसे वाटतात. अेक म्हणजे मला त्यांनी कधी अपशब्द वापरे नाहीत व कधी अंगाला बोट लावले नाही.`[७] त्यांच्या शुध्द वर्तनाचीही त्यांनी स्तुती केली आहे. छळ सहन करूनही आपल्या सासऱ्याच्या अेक दोन चांगल्या गुणाबद्दल प्रशंसेचे अुद्गार काढणारी ही गृहिणी किती अुदारमनस्क, सौजन्यशील आणि निष्पाप मनाची होती याची जाणीव होअून वाचकाला लक्ष्मीबाअींबद्दलची अेक विशेष प्रकारची आत्मीयता निर्माण होते.

पतिपरायणता किंवा पतिनिष्ठा हा लक्ष्मीबाअींच्या स्वभावाचा अेक प्रमुख विशेष मानावा लागेल. त्यांचे हे आत्मचरित्र त्यांच्या पतीबरोबरील

सहजीवनाचाच अितिहास आहे. त्यांच्या संसारात सदैव आसू आणि हासू यांचा खेळ चालत असताना त्यांनी आपल्या पतीला सावलीप्रमाणे साथ दिली. पण त्याचबरोबर पतीची केवळ सावली न बनता आपले स्वतंत्र व्यक्तिमत्त्वही कायम ठेवले.

मुरबाडहून टिळक मुंबअीस निघून गेले व लक्ष्मीबाअी अेकट्याच राहिल्या. त्यावेळची त्यांची मन:स्थिती व टिळकांविषयीचे प्रेम त्यांच्या मामंजींबरोबर झालेल्या खालील संवादावरून दिसून येते.

मामंजी म्हणत -

` आज तुझ्या नवऱ्याचे पत्र आले. `

` हं `

` त्याला सरदारगृहात धोतर धुण्याचं काम मिळालं आहे. `

` मग मी ती वाळत टाकीत जाअीन. `

` तो तेथली पाने वाढतो. `

` मग मी अुष्टी काढीन, मला तुम्ही मुंबअीला नेअून पोचवा. ` `

नानासाहेब पेंडशांच्या मुलीचे - धारूताअीचे - लग्न निघाले. ती लक्ष्मीबाअींची आवडती भाची. टिळकांनी लक्ष्मीबाअींना लग्नाला जाण्याची तयारी करावयास सांगितले. तथापी रिकाम्या हातांनी लग्नाला कसे जायचे याची चिंता लक्ष्मीबाअींना पडली. या प्रसंगीचे वर्णन करताना त्या म्हणतात,

` मी लंकेची पार्वती व टिळक कफल्लक शंकर, शंकर पार्वतीच्या चरित्रातील अशाच अेका प्रसंगाची आठवण होअून मला हसूंहि आले व रडूहि आले. ` `

धारूताअीच्या लग्नात आपण गरीब म्हणून आपली अुपेक्षा होते, असे त्यांना वाटले. अशा प्रसंगीच केवळ सर्दी झाली म्हणून तारा करून टिळकांनी लक्ष्मीबाअींना बोलावून घेतले. चार दिवस बहिणीकडेही धड राहू न दिल्यामुळे लक्ष्मीबाअींना खूप संताप आला. टिळकांच्या सहवासात त्यांना असे अनेक प्रसंग सहन करावे लागले.

टिळकांशी अनेक बाबतीत त्यांचे जमत नसले तरी टिळकांच्या मताविरुद्ध त्या कधी वागल्या नाहीत. टिळकांशी त्या पूर्णपणे अेकरुप झाल्या होत्या. राजनांदगांवला टिळकांनी वक्तृत्व स्पर्धा आयोजित केली, त्यावेळी घरात पैसा नसताना देखील लक्ष्मीबाअींनी या स्पर्धा यशस्वी होण्यासाठी टिळकांना पूर्ण सहकार्य दिले. आयुष्यभर अत्यंत कष्ट घेअून व काटकसर करुन टिळकांचा संसार चालविला. गरिबीमुळे दत्तूच्या दुधासाठी किंवा भातासाठी त्यांना अितरत्र तोंड वेंगाडावे लागले पण त्यांनी कधी धीर सोडला नाही की कधी आपल्या चेहऱ्यावरचे हसू मावळू दिले नाही.

टिळकांची ख्रिस्ती धर्माकडे प्रवृत्ती होअू लागल्यावर लक्ष्मीबाअींच्या मनाची अेकच घालमेल सुरु झाली. लोक त्यांना टिळकांच्या पत्रव्यवहारावर नजर ठेवण्याचा व त्यांच्या टेबलावरील बायबल जाळण्याचा सल्ला देअू लागले. तथापि लक्ष्मीबाअी या बुध्दिवादी होत्या. त्या लोकांना विचारीत, ' ' बायबलची ही प्रत जाळली, तर साऱ्या जगातल्या प्रती नाहीशा होतील का ! '[१०] टिळकांची कागदपत्रेही त्या लोकांना दाखवीत नसत. अेकदा त्यांनी टिळकांना ' खरंच काहो तुम्ही ख्रिस्ती होणार ! ' असा प्रश्न विचारला. टिळकांनीही ' मी ख्रिस्ती होत नाही ' असे अुत्तर दिले. लक्ष्मीबाअी मात्र खोलीचे दार लावून रडत बसल्या व त्यांनी त्यांची पहिली कविता त्याचवेळी लिहिली.

' म्हणे जातो सोडून नाथ माझा
अता कवणाला बाहूं देव राजा '[११]

टिळकांसाठी तिळतिळ तुटणारे त्यांचे मन येथे जाणवते. टिळक ख्रिस्ती झाल्यावर लक्ष्मीबाअींना मोठा धक्का बसला पण टिळकांची खुशाली अैकल्यानंतर त्या आपल्या मावास म्हणाल्या, ' कुठेही असले नि सुखरुप असले म्हणजे झाले. ते गेले तर त्यांनी काय माझ्या कपाळाचे कातडे थोडेच काढून नेले आहे ! '[१२]

त्यांच्या या अुद्गारात त्यांचे टिळकांविषयीचे प्रेम, चिंता व दु:ख व्यक्त होते. पुढे लक्ष्मीबाअींचा टिळकांशी पत्रव्यवहार सुरु झाला, त्यात त्यांनी कवितारुपाने आपले मनोगत व्यक्त केले. आपल्या पतीचे त्यांना कधीही विस्मरण झाले नाही. पती परत यावा, म्हणून त्यांनी देवदेवतांना साकडे घालण्यासही सुरुवात केली. त्याचे वर्णन वाचताना मनोरंजक वाटले तरी त्यांच्या दु:खार्त मन:स्थितीची त्यावरुन कल्पना येते. त्या म्हणतात, ' जलालपुरास अेक मला मोठा मारुती आहे. त्याच्या हातात मी काठी देत असे. हेतु हा की त्याने टिळकांच्या मागे लागून त्यांना परत आणावे. '[१३] गंगेपासून घरापर्यंत त्या पावले काढीत, रोज देवीला तांबडे फूल वाहत व फूल मिळाले नाही त्या दिवशी अुपवास करीत. संकटकाळात बुध्दी चालेनाशी झाल्यावर लक्ष्मीबाअी अंधश्रध्देच्या कशा आहारी गेल्या होत्या, हे यावरुन दिसून येअील.

१० फेब्रु. १८९५ ला टिळक ख्रिस्ती झाल्यानंतर जवळ जवळ साडेचार वर्षे लक्ष्मीबाअींची पतीपासून ताटातूट झाली. १८९९ च्या जुलै मध्ये टिळकासमवेत त्या नगरास गेल्या. टिळकांच्या सहवासात लक्ष्मीबाअींच्या विचारात बदल होत जाअून त्या सुधारणावादी मताच्या बनल्या. टिळकांच्या घरीही कडक सोवळे पाळणाऱ्या लक्ष्मीबाअींना अेकदा मुसलमानाच्या हातचे पाणी प्याल्यानंतर वांती झाली. त्यांना सडकून ताप भरला व त्या आजारी पडल्या. डोक्यात विचारांचे काहूर माजले असतानाच त्यांना सूर्यप्रकाशासारखा प्रकाश पडल्याचा भास झाला व त्यांच्या मनाला जखडून टाकणाऱ्या जातीभेदाच्या साखळ्या खळाखळ तुटून पडल्या. ' देवाने जाती केल्या का माणसाने ? .... मनुष्यप्राण्यात जर देवाने जाती केल्या तर त्याच देवाने प्राणिसृष्टीत का निरनिराळ्या जाती केल्या नाहीत ? '[१४] असे प्रश्न त्यांच्या मनात अुद्भवले व त्यांनी जातीभेदाचा त्याग करण्याचा निश्चय केला. यापुढे सर्वांच्या हातचे खाण्याचे त्यांनी ठरविले. पुढे

मंगिणीच्या हातचे खातानाही त्यांना वाअीट वाटले नाही. त्यांच्या व्यक्तिमत्वातील विकसनशीलता व गतिमानताच या प्रसंगातून दिसून येते. अेके दिवशी त्या डॉ. बालैंटाअीन साहेबांच्या बंगल्यावर गेल्या व त्यांनी ख्रिस्ती होण्याची अिच्छा व्यक्त केली. दुसऱ्याच दिवशी ( ८ जुलै १९०० ला ) त्यांचा रेव्ह. ओहळ यांच्या हस्ते बाप्तिस्म्याचा विधी राहुरी येथे पार [illegible] पडला. लक्ष्मीबाअींच्या जीवनात हे क्रांतिकारक परिवर्तन घडले.

टिळक हे आधुनिक संत होते, त्यांना प्रपंचाची काळजी नसे, म्हणून टिळकांच्या बरोबर संसार करताना लक्ष्मीबाअींची खूप तारांबळ अुडे. टिळकांना पैशाची चिंता कधीच वाटत नसे. पैसा आला की तो कसा खर्च करायचा याचाच ते विचार करीत. टिळक बाहेरगावी गेले की ते महिनामहिना परत येत नसत व लक्ष्मीबाअींना मोठ्या मुश्किलीने संसाराचा गाडा रेटावा लागे. नागपूरला असताना टिळक बाहेरगावी गेले व लक्ष्मीबाअींची त्यांनी कोणतीच तरतूद केली नाही. लक्ष्मीबाअींनी कसेबसे दिवस काढले व शेवटी तार करून टिळकांना बोलावून घेतले. टिळक जेवायला बसल्यावर ताक, कण्या, मीठ व बागेतील मिरच्या ठेवल्या. ` हे काय ? ` असे टिळकांनी विचारले. त्यावर लक्ष्मीबाअी म्हणाल्या, ` तुम्ही गेल्यापासून मी जे खात होते ते। ` [१५]स्पष्ट व परखडपणे बोलणे हे लक्ष्मीबाअींच्या स्वभावातील अेक वैशिष्ट्य होते.

टिळक ख्रिस्ती झाल्यावर सखारामभाअूजी लक्ष्मीबाअींना हे हे ` तुम्ही टिळकांना सूटपत्र द्या ` असे सांगू लागले. त्यावेळी लक्ष्मीबाअींनी त्यांना रोखठोकपणे अुत्तर दिले - ` आता कुठे ते बांधलेले आहेत। सूटपत्र कशाचे देअू ? मी का पळून गेले ? का निघून गेले ? नसे त्यांचे कोणी नाही, तसे माझे कोणी नाही. मला पैसा नाही. विद्या नाही. मूल लहान. मी काय करणार ? तुमची सगळ्यांची भांडीच घासणार की नाही ? तुमची ही शिष्टाअी पुरे. त्यांना पत्र पाठवा. म्हणावे आधी येअून बायकोचे लग्न नीटनेटके लावून द्या आणि मग

स्वत:चे लग्न करा. तुम्हाला काही वाटत नाही आपण कोणाशी बोलतो ते ?' [१६] वेळप्रसंगी असे कडक प्रत्युत्तर लक्ष्मीबाई देऊ शकत. अशावेळी कोमल हृदयाच्या लक्ष्मीबाई याच का, असा प्रश्न पडतो. टिळक आपल्या औदार्यामुळे व भोळेपणामुळे अनेक लोकांना आपल्या घरी आश्रय देत. लक्ष्मीबाईच अशावेळी त्या माणसांची योग्य पारख करून त्यांना हाकलून देत. प्रत्येकाशीच त्या स्पष्टपणे बोलावयाच्या. म्हणूनच बालकवी ठोंबरे त्यांना एकदा म्हणाले होते, ' लक्ष्मीबाई, तुमच्याकडे पंचम जॉर्ज आले तरी त्यांना तुम्ही सांगाल,की बाबारे येताना तेवढे फाटक लोटून घे.' [१७]

संकटकाळी अत्यंत धीराने व आत्मविश्वासाने वागणे हे लक्ष्मीबाईंचे वैशिष्ट्य होते. त्यांच्या- जीवनात त्यांना अनेक कठीण प्रसंगांना सामोरे जावे लागले पण त्या कधी डगमगल्या नाहीत. टिळक ख्रिस्ती झाल्यावर जरी त्या खचून गेल्या तरी त्यांनी त्या प्रसंगातूनही मार्ग काढलाच. आपल्या या स्वा स्वभावाबद्दल त्या म्हणतात, ' शरीराचा त्याग करण्याचे प्रसंग मजवर कितीतरी वेळेस आले असतील. पण मी तो कधीच केला नाही व मला वाटते, तो कधी होणे शक्यही नव्हते. माझ्या मनाची ठेवणच अशी आहे की, सर्व निराशामय अंध:कारातून चाचपडत धडपडत का होईना, पण आपला मार्ग आक्रमायचा. मध्येच पडून प्राण सोडायचा नाही. थोडक्यात म्हणजे रबरी चेंडूप्रमाणे माझे आहे.' [१८] दुसऱ्या एका प्रसंगी त्या म्हणतात, ' तशी फार जिवट स्वभावाची व चिवट शरीराची आहे.' [१९] त्यांच्या अंगी हे धैर्य असल्यामुळेच त्या आपले जीवनानुभव अलिप्तपणे व संयमाने सांगू शकतात. सरोजिनी वैद्य म्हणतात, ' स्मृतिचित्रामागील लेखिका लक्ष्मीबाई आपल्याला वृत्तीने कणखर वाटतात. त्या आपल्या अनुभवसृष्टीवर सहजपणे हुकूमत ठेवून असतात. भांबावलेल्या जीवनाची प्रतीती मुळीच न भांबावता त्यांना देता येते.' [२०]

लक्ष्मीबाअीमध्ये आत्मपरीक्षणाची शक्तीही आढळते. टिळक त्यांना लिहिण्या-वाचण्यास शिकवू लागले पण लक्ष्मीबाअींना त्यांच्याजवळ बसून शिक्षण घेणे जमले नाही. याचे कारण सांगताना त्या म्हणतात, ` अेक तर मी लहान नव्हते. दुसरे मी पक्की नव्हते. तिसरे मला हसू फार येत असे.`[२१] पुढे त्या म्हणतात, `बायकोने आपल्यासारखे व्हावे, असे टिळकांना वाटे व मी पडले मठ्ठांतली मठ्ठ. तेव्हा ते व्हावयाचे कसे ! `[२२] यात जसा विनोद आहे, त्याचप्रमाणे स्वतःकडे कमीपणा घेण्याची तयारीही आहे. आपणास बेताचेच रूप लाभले असूनही टिळकांनी कसे पसंत केले, याबद्दल त्या आश्चर्यही व्यक्त करतात. आपणास ` मानसशास्त्र ` समजत नाही, ` ॲप्रिसिअेशन ` नाही असे टिळकांचे मत होते, हेही त्या स्पष्टपणे सांगतात. टिळक ख्रिस्ती मिशनऱ्याकडे बायबल वाचायला जायचे त्यावेळी लक्ष्मीबाअी त्यांच्यावर पाळत ठेवायच्या व त्याबद्दल त्यांना मारही खावा लागला, ही गोष्टही त्या लपवून ठेवत नाहीत.

लक्ष्मीबाअी स्वभावाने अत्यंत विनोदी व मिस्किल आहेत. आपल्या जीवनातील सुखदु:खांचे प्रसंग रंगवून सांगताना बाअींची विनोदवृत्ती सदैव अुचंबळून येत असते. मामंजींच्या पूजेच्या अुपकरणांना डाग पडत. त्याबद्दल त्या म्हणतात, ` अुपकरणी होती तांब्याची, पाणी विहिरीचे, राख लाकडाची व दिवस पावसाचे.`[२३]

लक्ष्मीबाअी सोळा वर्षांच्या झाल्या असल्या तरी त्यांची बाहुलीच्या खेळाची आवड गेलेली नव्हती. भिकूताअीकडे असतांना या बाहुलीच्या खेळामुळे कशी फजिती झाली हे त्या विनोदी पध्दतीने सांगतात - ` बाहेर चौघडा बंद झाल्यावर माझ्या हृदयात चौघडा वाजू लागला. बहिणीने पंचपक्वान्नांचे ताट मजपुढे वाढून ठेवले. त्यात कोणती पक्वान्ने नव्हती ! गाल-गुरोळ्या होत्या, चापटपोळ्या होत्या, धम्मकलाडू होते, मुष्टिमोदक होते. मुरडकानोले होते.`[२४]

लक्ष्मीबाओी अेका वसतिगृहाच्या देखरेखीचे काम करीत असताना वसतिगृहातील काही मुली सहलीच्या वेळी समुद्रात वाहून गेल्या. लक्ष्मीबाओींना कोर्टात ज्यूरींच्या पुढे अुभे रहावे लागले. त्यावेळच्या आपल्या स्थितीचे वर्णन करताना त्या म्हणतात, ' जणू काही लक्ष्मीबाओी डेराच घुसळण्यास अुभ्या आहेत. पुढे कठड्यावर मान आपटत आहे, आता अुद-कापराचाच अुशीर की हे वारे लागणार बोलायला ! जबानीला सुरुवात झाली, पण त्या थाटात तोंडातून शब्दच निघेना. '[२५] लक्ष्मीबाओींची विनोदबुध्दी त्यांना अगदी सावलीसारखी साथ देते, ती अशा करुण-गंभीर प्रसंगीही त्यांना सोडून जात नाही, हे दिसून येते. लक्ष्मीबाओींच्या विनोदबुध्दीबद्दल सरोजिनी वैद्य यांचे मत लक्षात घेण्यासारखे आहे. त्या म्हणतात, ' लक्ष्मीबाओींच्या विनोदाचे हे काही मासले पाहिले की आपल्या ध्यानात येते, हा विनोद अुपरा नाही, ती स्वत:कडे बघण्याची अेक क्रीडापूर्ण दृष्टीच आहे. ज्या दृष्टीने त्या स्वत:कडे बघतात, त्याच दृष्टीने अेखाद्या व्यक्ती वा प्रसंगाकडे किंवा त्यांच्या परस्परसंबंधाकडेही त्या पाहतात,... या गुणामुळे लक्ष्मीबाओींचे सारे जीवनच क्रीडादृष्टीने खेळला गेलेला अेक गंभीर सामना असल्यासारखे आहे, असे ' स्मृतिचित्रे ' खाली ठेवताना वाटू लागते. '[२६] लक्ष्मीबाओींच्या याच वैशिष्ट्याबद्दल गंगाधर गाडगीळ म्हणतात, ' लक्ष्मीबाओींच्या विनोदाचा हा झरा सारखा झुळझुळ वाहात असतो आणि त्यांच्या साऱ्याच स्मृतींना प्रसन्न, हसऱ्या करतो. अत्यंत दु:खाच्या गंभीर प्रसंगीदेखील त्यांची विनोदबुध्दी त्यांना सोडून जात नाही. या विनोदाने त्यांच्या अनुभवांना अेक वेगळेच परिमाण प्राप्त करुन दिले आहे, त्यांना अधिक अर्थपूर्ण केले आहे. '[२७]

टिळक ख्रिस्ती झाले व त्यानंतर लक्ष्मीबाओींनीही ख्रिस्ती धर्म स्वीकारला. तथापी लक्ष्मीबाओींच्या धर्मान्तराबद्दल अेक गोष्ट लक्षात घेण्यासारखी आहे, ती म्हणजे लक्ष्मीबाओी ख्रिस्ती झाल्या तरी त्यांच्या वरील हिंदू धर्माचे संस्कार काही

पूर्णपणे पुसून गेले नाहीत. त्यांनी कधीच मांसाशन केले नाही व त्यांचा त्या ' आमच्या घरात कधी मांस शिजत नाही ' [२८] असा अभिमानपूर्वक उल्लेखही करतात.

देवदत्ताचे लग्न २० अेप्रिल १९१८ मध्ये झाले. ते चैत्र महिन्यात होअू नये असे लक्ष्मीबाअींचे मत होते. त्यामागची कारणमीमांसा टिळकांनी देवदत्तांना ३ अेप्रिल १९१८ रोजी लिहिलेल्या पत्रातून कळण्यासारखी आहे. टिळक लिहितात, " She is simply frightened to find that if you are married any day after the 11th of this month your marriage will be performed in चैत्र which she believes to be the most unauspicious month for the ceremony and must cause in future some kind of harm." [२९] देवदत्ताचे लग्न शेवटी चैत्रातच झाले व त्यानंतरच्या वीसबावीस महिन्यात वीसबावीस माणसे काळाने हिरावून नेली. प्रत्येक मृत्यूची बातमी येताच लक्ष्मीबाअी प्रथम त्या चैत्रातल्या लग्नाचा अुद्धार करीत. ख्रिस्ती होअूनही शुभ-अशुभाच्या, शकुन-अपशकुनाच्या दृढमूल झालेल्या कल्पना लक्ष्मीबाअींना सोडता आल्या नाहीत.

लक्ष्मीबाअींनी स्वत: आपल्या ख्रिस्ती धर्म स्वीकारामागील मानसिक विकासाचे वर्णन ' अगदी स्टेप बाय स्टेप ' असे केले असले तरी डॉ. कमलाबाअी देशपांडे यांनी मात्र ' शेवटी सतीला पतीवाचून देव नाही, ही हिंदू धर्माची शिकवणच ख्रिस्ती धर्म स्वीकारतांना त्यांच्या पाठीशी अुभी होती ' [३० अ] असे प्रतिपादन केले आहे. मुंबअी दूरदर्शनावर ' स्मृतिचित्रे ' हा चित्रपट सौ. विजया मेहता यांनी सादर केल्यानंतर ' लोकप्रभा ' साप्ताहिकातील वाचकांच्या प्रतिक्रियांना अुत्तर देताना अशोक देवदत्त टिळकांनी या प्रश्नाचा मुद्याचा परामर्श घेअून लक्ष्मीबाअींच्या विकासाच्या सात पायऱ्या स्पष्ट केल्या आहेत. [३० ब] तथापि टिळक जर ख्रिस्ती झाले नसते तर लक्ष्मीबाअीही ख्रिस्ती झाल्या नसत्या, ही गोष्ट सहज लक्षात येण्यासारखी आहे.

ख्रिस्ती समाजात गेल्यामुळे व टिळकांच्या स्वभावामुळे लक्ष्मीबाअींचे कार्यक्षेत्र वाढले. त्यांचा जीवनाविषयीचा आत्मविश्वास वाढला. टिळक ख्रिस्ती झाल्यावर भाअु, दीर, बहीण यांच्या आश्रयाने जगणाऱ्या लक्ष्मीबाअी पुढे स्वत: अनेकांच्या आश्रयदात्या बनल्या. टिळकांनी अुत्तेजन दिल्यामुळे काव्य-लेखन-वक्तृत्वात त्यांची प्रगती होअू लागली. टिळक ख्रिस्ती झाल्यावर त्यांनी प्रथम कविता लिहिली व टिळकांच्या चिरवियोगानंतर त्यांनी त्यांचे ` ख्रिस्तायन ` पूर्ण केले. पुढे पुणे - लोणावळ्यास त्यांची कीर्तने होअू लागली. नाशिकला १९३३ साली भरलेल्या कविसंमेलनातील त्यांचे स्वागताध्यक्षीय भाषण तर महाराष्ट्रभर गाजले. १९३६ साली नागपूर येथे झालेल्या ख्रिस्ती साहित्य संमेलनातील त्यांच्या भाषणासही खूप प्रसिध्दी मिळाली. पतित स्त्रियांना न्याय मिळावा म्हणून भाषणे व लेख लिहून लोकमत बनविण्याचा त्यांनी प्रयत्न केला. ` स्मृतिचित्रे ` च्या लेखनात तर त्या अितक्या रमून गेल्या की आपल्या सत्कार-समारंभास अुत्तर देताना त्यांनी ` ज्या दिवशी मला पूर्णविराम मिळेल त्याच दिवशी माझ्या स्मृतिचित्रांना पूर्णविराम मिळेल `[३१] असे निर्धारपूर्वक सांगितले व लक्ष्मीबाअींचा ` फुलस्टॉप `[३२] अजून झालेला नाही हे स्पष्ट केले.

लक्ष्मीबाअी टिळकांचा जीवनप्रवास मुलगी-बहीण-आअी-आजी आदी नात्यांनी झाला व त्यांना सर्वांचीच सेवा करण्यात धन्यता वाटली. त्यांच्या जेष्ठ भगिनी भिकूताअींचा ( पेंडसे जानकी नारायण ) त्यांच्यावर फार लोभ होता. लक्ष्मीबाअी व भिकूताअी यांच्या वयात जवळजवळ पंधरा सोळा वर्षांचे अंतर होते. त्यामुळेच कदाचित् त्या लक्ष्मीबाअींवर मातृवत् प्रेम करीत. लक्ष्मीबाअी धाकटताअींच्या - भिकूताअींच्या अेकुलत्या अेक मुलीच्या - विवाहास गेल्या असताना बहिणीने आपली चौकशी केली नाही कारण आपण गरीब, आपल्या अंगावर गोठतोडे नाहीत, असा विचार त्यांच्या मनात आला व त्यांना रात्री झोप येअीना. पण, भिकूताअींनी त्यांचा गैरसमज दूर केला व आपल्या अंगावरचे सर्व दागिने काढून

लक्ष्मीबाओींच्या अंगावर घातले. या लग्नसोहळ्यानंतर लक्ष्मीबाओींना महिना-दोन महिने ठेवून घेण्याचा त्यांचा विचार होता, परंतु टिळकांनी तार करून बोलावल्यामुळे पेंडशांनी लक्ष्मीबाओींना स्वगृही पाठवून दिले. लक्ष्मीबाओी व भिकूताओी यांच्यामध्ये अितके प्रेम होते की कधीही घराबाहेर न पडणाऱ्या, अगदी माहेरीसुध्दा न जाणाऱ्या भिकूताओी लक्ष्मीबाओींच्या बाळंतपणासाठी जलालपुरास दोन-तीन महिने राहिल्या होत्या.

टिळकांची प्रवृत्ती ख्रिस्ती धर्माकडे होत असताना त्यांनी लक्ष्मीबाओींना भिकूताओीकडे पाठवून दिले. लक्ष्मीबाओींची अवस्था पाहून ` मने काय तुझी ही दशा झाली आहे । ` [३२] असे म्हणून त्यांनी लक्ष्मीबाओींना मिठी मारली.

टिळक ख्रिस्ती झाल्यावर लक्ष्मीबाओींना खूपच दु:ख झाले व आत्महत्येचे विचारही त्यांच्या मनात येऊ लागले. अेकदा घरी निजानीज झाल्यावर त्या सुंदरनारायणाच्या डोहात अुडी टाकण्यास निघाल्या होत्या. पण बाहेर राअुंडची अलबेल कानी पडताच घरातील आडातच जीव द्यावा असा त्यांनी विचार केला. पण नानासाहेबांची अप्रतिष्ठा होओील असा विचार करून त्यांनी तो बेत तडीस नेला नाही. भिकूताओींनी या काळात लक्ष्मीबाओींची खूप काळजी घेतली. त्या वेड्यासारखे करू लागल्या म्हणजे दत्तूसाठी तरी नीट वागण्याचा त्या अुपदेश करीत. टिळकांनी पुन्हा स्वधर्मात परत यावे, यासाठीही त्या अुत्सुक होत्या. तथापि ख्रिस्ती झालेल्या पतीकडे लक्ष्मीबाओींनी जाअू नये यासाठी त्या दक्ष होत्या. त्यासाठी त्यांनी लक्ष्मीबाओींना जलालपूरला आणून ठेवले. त्यांना अुद्देशून ` मैना, तुझा ग पिंजरा मायेचा ` हे गाणे त्या म्हणत. लक्ष्मीबाओी पुढे टिळकाबरोबर निघून गेल्यावर मात्र त्यांना मोठा धक्का बसला व त्यांनी अंथरूण धरले. पुढे त्यांचा मृत्यू झाला. लक्ष्मीबाओी म्हणतात, माझ्यामुळे तिला कष्ट, आजार व शेवटी मृत्यू आला, तेव्हा मला ती बातमी अैकून काय वाटले असेल ह्याची शब्दापेक्षा कल्पनेनेच चांगली जाणीव होओील.` [३३]

लक्ष्मीबाओी अेक वत्सल माता होत्या. आपल्या मुलीच्या संगोपनात त्या अगदी दक्ष असत. त्यांची पहिली दोन अपत्ये वारली व त्यानंतर दत्तू ( देवदत्त नारायण टिळक ) झाला. बाओींना अतिशय हलाखीत दिवस काढावे लागत असल्याने दत्तूला देण्यासाठी भातही नसायचा. अशावेळी लक्ष्मीबाओी पैशाच्या साळीच्या लाह्या आणून त्या दुधात भिजवून दत्तूला खाऊ घालायच्या. दत्तूला दूध देण्याचीही त्यांना विवंचना असायची. अशावेळी त्यांना आपल्या माहेरच्या संपन्नतेची आठवण यायची. भिकूताओींची श्रीमंती आठवायची. पण त्या कधीही माहेरी गेल्या नाहीत. अत्यंत धैर्याने त्यांनी आपल्या मुलाचे पालन-पोषण केले. टिळक ख्रिस्ती होण्यासाठी मुंबओीस निघाले असताना त्यांच्या कामात अडथळा यावा म्हणून त्यांनी दत्तूला बरोबर घेऊन जाण्यास सांगितले. टिळकांनी दत्तूला नाशिक मुक्कामी पेंडशांच्या घरी सोडले व स्वतः अेकटेच मुंबओीस गेले. त्यावेळी दत्तू अवघा दोन वर्षाचा होता. पेंडशांच्याकडे तो राहीना तेव्हा जलालपुरास त्याच्या मामाकडे त्याची रवानगी करण्यात आली. तेथे त्याला गोवर झाला. पुढे सव्वा महिन्यानंतर लक्ष्मीबाओींची व दत्तूची भेट झाली तेव्हा दत्तूला पाहून लक्ष्मीबाओींना रडू कोसळले.

दत्तूचे चिमखडे बोल लक्ष्मीबाओींना कसे हृदयस्पर्शी वाटायचे याचे अेक अुदाहरण पाहण्यासारखे आहे. लक्ष्मीबाओी आपल्या भावाकडे ( केशवराव मामा ) असताना पिकापाण्याच्या गोष्टी निघाल्या. त्यावेळी त्यांच्या भावाची मुले दत्तूला म्हणू लागली - " दत्तू , बघ आमची शेते कशी आहेत. आमचे बैल, नांगर कसे आहेत. " त्यावेळी लक्ष्मीबाओींच्या भावाने आपल्या मुलांना तसे न बोलण्यास बजावले. मुले त्यांचे अैकेनात तेव्हा दत्तू आपली पाटी पुढे करीत म्हणाला , " हे पहा माझे शेत. ही पेन्सिल माझा नांगर आणि ही बोटे माझे बैल आहेत." पण तुझ्या या शेतात दाणे काही अुत्पन्न होत नाहीत " असे त्यांनी म्हटल्यावर

दत्तू म्हणाला, ` ही अशी माझे दाणे आहेत. ` [३४] मुलांविषयी वात्सल्य निर्माण करणाऱ्या या प्रसंगाचे वर्णन करताना लक्ष्मीबाईंच्या वात्सल्याला भरते येते व त्यातून त्यांच्या मातृत्वाचे दर्शन घडते.

दत्तूचा आजार, दत्तूचे शिक्षण, दत्तूची मुंज, दत्तूचे लग्नप्रसंगी हरवणे अशा विविध प्रसंगातून लक्ष्मीबाईंचे आपल्या अपत्याविषयीचे प्रेम व्यक्त होते.

लक्ष्मीबाईंचे केवळ आपल्या अपत्यावरच प्रेम होते असे नव्हे. त्यांच्या विशाल अंत:करणात अनेक अनाथांना स्थान मिळत गेले. हौशी, दया, चिकी, चंपा अशा अनेक मुलींचा त्यांनी सांभाळ केला व त्यांना मातृप्रेम दिले. ` देवाच्या दयेने मला बरेच मानसपुत्र व मानसकन्या आहेत ` [३५] असे उद्‌गार काढताना त्याना धन्यता वाटते. बालकवींचाही त्यांनी मातेप्रमाणे सांभाळ केला.

नगरला प्लेग झाल्यावर लक्ष्मीबाईंनी सेग्रिगेशन कँम्पवरही सेवाकार्य केले. रोग्यांचे खाणेपिणे, औषधपाणी, त्यांची तोंडे धुणे, त्यांना स्पंजबाथ देणे व वेळ पडली म्हणजे त्यांचा शेणगोठा करणे, ही कामे त्यांनी टिळकांच्या बरोबरीने केली. इतकेच काय पगार वाढवावा म्हणून भंग्यांनी संप केल्यावर टिळकांनी व बाईंनी भंग्याचे कामही केले. समाजसेवेच्या या कार्यात टिळक हेच त्यांचे गुरु होते.

लक्ष्मीबाईंच्या एकंदर व्यक्तिमत्वावरच टिळकांची अमिट अशी छाप उमटलेली आहे. ` डेक्कन क्वीनच्या मागे एखादा खटारा बांधावा ` त्याप्रमाणे टिळकांशी बांधले गेलेले त्यांचे आयुष्य नंतर डेक्कन क्वीन इतकेच गतिमान झाले. टिळकांच्या सहवासाने स्वत:च्या जीवनात घडलेल्या या परिवर्तनाबद्दल त्या म्हणतात, " महाराचा नुसता शिंतोडा अंगावर उडाल्याचा भास झाला तर साऱ्या जन्मभर स्वत:ला व घरातील सगळ्यांना माझ्या वडिलांनी घासून पुसून घेतले होते. त्याच पित्याची मी कन्या बाईस भंग्याच्या घरचे अन्न खाते काय नि नगरच्या

दवाखान्यात हलकी समजलेली कामे करायला धावते काय ! पण यात वाणायचे झाले तर ते टिळकांनाच वाणले पाहिजे. ते माझे या बाबतीत गुरु होते.`[३६] लक्ष्मीबाईंनी मंगिणीच्या हातचा फराळ खाल्ला तेव्हा तर ` तू माझ्याही पुढे गेलीस ! `[३७] अशी टिळकांनी त्यांची प्रशंसा केली.

१९१९ ला टिळक निधन पावले व लक्ष्मीबाईंना आपला सूत्रधार गेल्याची जाणीव झाली. टिळकानंतरही त्यांना खूप हाल-अपेष्टा सहन कराव्या लागल्या, नोकरी करावी लागली. ~~कराच~~ कराची सारख्या सुदूर शहरात वास्तव्य करावे लागले. तथापि त्यांचे धैर्य त्यांना कधीच सोडून गेले नाही. त्यांनी प्रेमाने सांभाळ केलेल्या बेबीने धर्मान्तर करुन हेमचन्द्र जोशी यांच्याशी विवाह केला, त्याचा जबर आघात लक्ष्मीबाईंच्या मनावर झाला. ज्या बेबीने ` ख्रिस्तायन `पूर्ण करावे अशी टिळकांची अिच्छा, तिनेच ख्रिस्ती धर्म सोडल्यावर लक्ष्मीबाईंनी स्वत:च ख्रिस्तायन पूर्ण करण्याचा निर्णय घेतला व अहोरात्र त्या प्रयत्नात स्वत:ला झोकून दिले. टिळकांनी अपूर्ण ठेवलेल्या अकराव्या अध्यायापासून सुरुवात करुन ६१ अध्यायापर्यंत ख्रिस्तायनाचे लेखन त्यांनी केले. ` ख्रिस्तायन ` पूर्ण केल्यावरच त्यांना आपले ख्रिस्ती होणे सार्थकी लागले, असे वाटले.

देवदत्त टिळकांनी त्यांच्या शेवटच्या आजारपणाने हृदयस्पर्शी वर्णन केले आहे. शेवटपर्यंत त्यांची खेळकर विनोदबुद्धी त्यांना सोडून गेली नव्हती. त्यांना काही स्त्रिया भेटायला आल्या तेव्हा लक्ष्मीबाई म्हणाल्या, ` अग तुम्ही माझा सत्कार समारंभ केलात ना ! तेव्हा मला लागली आहे दृष्ट. थोड्याशा मीठमोहऱ्या ओवाळून टाका माझ्यावरुन.`[३८]

पांगारकर बुवा त्यांना भेटायला आले. त्यांना पाहून त्या म्हणाल्या, ` या बुवासाहेब ! आत्मा व कुडी यांचा झगडा चालला आहे. पाहू या आता कोण जिंकते ते.`[३९] समोर मृत्यू दिसत असताना देखील त्यांनी काढलेले हे अुद्गार

त्यांच्या निस्संग, व अुदात्त अशा जीवनदृष्टीचे दर्शन घडवितात.

ऑपरेशनलाही त्या अगदी सहज तयार झाल्या. स्ट्रेचरवर घालून त्यांना ऑपरेशनरूम मध्ये नेताना अून लागू नये म्हणून डॉक्टरांनी त्यांच्या तोंडावर चादर घातली ती त्यांनी दूर सरकावून दिली व आपण भित्रे नसल्याचे सांगितले. ऑपरेशन चालू असताना देखील त्या डॉक्टरांशी गप्पा मारीत होत्या, थट्टाविनोद करीत ~~म~~ होत्या.

ऑपरेशन यशस्वी झाले तरी त्यांच्या प्रकृतीचा धोका टळला नाही. शेवटी २४ फेब्रु. १९३६ ला त्यांची प्राणज्योत निमाली. टिळकांचे पुढील गीत भजनी मंडळीने त्यांच्या अंत्ययात्रेच्या वेळी म्हटले -

जिंकुन मरणाला मरणाला
जीव कुडीतून गेला
अक्षयतेचा अधिकारी हा
अिकडून तिकडे झाला
..........
प्रभुने त्याला किती दयेने
अजरामर हो केला [४०]

` स्मृतिचित्रां ` च्या लेखिका म्हणून व ` स्मृतिचित्रां ` तील अेक मनोवेधक व्यक्तिरेखा म्हणून लक्ष्मीबाअी खरोखरच अजरामर झाल्या आहेत !

२. रेव्ह. ना.वा. टिळक.

` स्मृतिचित्रे ` ही लक्ष्मीबाअी टिळकांची आत्मकथा असली तरी ती त्यांनी आपल्या पतीचे चरित्र सांगण्याच्या हेतूने लिहिलेली आहे. त्यामुळे हा अमोल ग्रंथ लक्ष्मीबाअी व रे. टिळक यांच्या सहजीवनाचा चित्रपट दर्शवितो, असे म्हणावे लागेल. त्यामुळे लक्ष्मीबाअी अितकेच रे. टिळकांचे व्यक्तिचित्रही यात

अत्यंत प्रभावीपणे साकार झालेले आढळते. टिळकांच्या व्यक्तिचित्रणाला ' स्मृतिचित्रा ' मध्ये मध्यवर्ती स्थान मिळाले आहे.

टिळकांशी लक्ष्मीबाओींचा विवाह अगदी बालपणीच झाला. त्यामुळे लक्ष्मीबाओींनी टिळकांच्या अगदी बालपणापासूनची हकीकत येथे सांगितली आहे. लग्नापूर्वी सखू नावाच्या मैत्रिणीच्या घरी त्यांची व टिळकांची पहिली भेट झाली व ती देखील टिळकांच्या कोपिष्टपणाचे दर्शन घडविणारी अशी ' खबरदार आमच्या घरात आलीस तर ! तंगडीच मोडीन ! ' [४१] अशा शब्दात टिळकांनी त्यांचे स्वागत केले होते, पण याच टिळकांशी त्यांचा विवाह झाला व त्यांच्या घरी त्या पाय रोवून बसल्या.

लग्नप्रसंगातील टिळकाविषयीची अेक हकीकत सांगताना त्या म्हणतात, ' स्वभावत: टिळकांना कधीच रुसता येत नसे. ते रागावत वाटेल तितके, पण रुसणे फुगणे त्यांना मुळीच ठाअूक नव्हते. ' [४२]टिळकांच्या स्वभावाचा हा पैलू त्यांनी अगदी सहजपणे स्पष्ट केला आहे.

टिळक हे मातृभक्त होते. त्यांना आपल्या वडिलाविषयी कधीच ओढ वाटली नाही व त्याचे कारणही तसेच सबळ होते. टिळकांच्या जन्मानंतर त्यांच्या वडिलांचे काम गेल्याने त्यांना आपल्या मुलाचा पायगुण अशुभ वाटत असे व ते त्यांना नतद्रष्ट समजत. टिळकांच्या वडिलांनी वामनरावांनी टिळकांच्या आअीला कधीच चांगली वागणूक दिली नाही, त्यामुळेही टिळकांना आपल्या वडिलांविषयी विशेष प्रेम नव्हते.

टिळकांच्या आअी कविता रचीत हे वामनरावांना आवडत नसे. त्या कविता ते जाळून टाकीत. टिळकांच्या आअीला अेका ख्रिस्ती बाअीने दिलेले बायबलमधील नीतीचे पुस्तकही वामनरावांनी जाळून टाकले, या घटनेचाही टिळकांच्या मनावर परिणाम झाला. रागाच्या आवेगात त्यांनी आपल्या वडिलांची खोड मोडण्याचे ठरविले व त्यांची चुन्याची डबी विहिरीत फेकून दिली.

अर्थात त्यांना वामनरावांनी फोकाने मार दिला.
या मारहाणीमुळे टिळक घरातून पळून गेले व सहा महिने बेपत्ता झाले. आपल्या आईला दु:ख होऊ नये म्हणून ते पळून जाईपर्यंत मात्र अत्यंत शांत राहिले. टिळक घरी परतल्यानंतरही त्यांच्या वडिलांनी आपल्या वागणुकीत काहीच बदल केला नाही. त्यामुळे वामनरावांची मोरवाड्यास बदली झाली तेव्हा त्यांना आनंद वाटला व ते आपल्या आईस म्हणाले, " आई, घरात दादा नसले म्हणजे बरे वाटते. ते नेहमी बाहेर राहिले तर किती छान होईल. मग आपल्याला काहीच त्रास नाही. "[४३]

टिळक लहानपणापासून बुध्दिवादी कसे होते याचे एक उदाहरण लक्ष्मीबाईंनी दिले आहे. लहानपणी टिळक हरवले होते, त्यावेळी त्यांच्या आईने मारुतीला नवस केला होता की टिळक सापडल्यास आपण मारुतीला वड्याची माळ घालू. टिळक सापडल्यावर त्यांनी वड्यांची माळ केली व टिळकांना ती माळ मारुतीस घालण्यासाठी दिली. पण टिळक तळ्यावर गेले आणि तेथे त्यांनी माळेतील सर्व वडे स्वत:च खाऊन टाकले व घरी परत आल्यावर ही हकीकत आपल्या आईस सांगितली. आईला वाईट वाटले तेव्हा टिळकांनी, " तू सांगतेस ना की देव लांब नाही. तो आपल्या अंत:करणात आहे, "[४४] असे सांगून तिची समजूत काढण्याचाही प्रयत्न केला.

एकदा वामनरावांनी स्वत:च्या आजारपणाची खोटी वार्ता देणारे पत्र लिहून टिळकांच्या आईला मोरवाड्यास बोलावून घेतले. आईशिवाय टिळकांना करमत नसे. म्हणून तेही बरोबर गेले. मर उन्हामध्ये मोरवाड्याचा दुर्गम मार्ग आक्रमून ही मायलेकरे जेव्हा मोरवाड्यास गेली तेव्हा वामनराव चक्क गप्पा मारीत बसलेले त्यांच्या दृष्टीस पडले. टिळकांच्या आईला आनंद झाला व त्या थोड्या वेळाने धुणे धुऊन डोक्यावर हंडा घेऊन वामनरावांच्या पुढे आल्या व हंडा खाली उतरविण्यास त्यांनी त्यांना सांगितले. त्याबरोबर वामनरावांनी त्यांची मान धरून कमरेत लाथ मारली. जानकीबाई ( टिळकांच्या आई ) ज्या जमिनीवर

पडल्या त्या पुन्हा उठल्याच नाहीत. तोंडात पाण्यावाचून काहीही न घेता राम राम म्हणत आठ दिवसातच त्या निधन पावल्या. टिळकांच्या मनावर या घटनेचा विलक्षण परिणाम झाला. ' न मातुः परं दैवतम् ' अशी त्यांची वृत्ती होती. मातृवियोगाने दुःखी झालेले टिळक नाशकास पळून गेले. ' टिळकांच्या डोळ्यासमोर आपल्या आओची मूर्ति अेकसारखी दिसत होती व कानात तिचे राम राम हे शब्द गुणगुणत होते. '[४५] असे टिळकांच्या त्यावेळेच्या मनःस्थितीचे वर्णन लक्ष्मीबाओंनी केले आहे. नाशिक येथे टिळकांनी आपला विद्याभ्यास सुरु सुरु केला. वेदशास्त्रसंपन्न गणेशशास्त्री लेले यांच्याकडे त्यांनी संस्कृतचे अध्ययनही केले. परंतु त्यांना आपल्या आओचे विस्मरण कधीच झाले नाही. पुढे ' गंगा ' नामक स्वरचित काव्य त्यांनी आपल्या आओस ' जिने स्वतः रचलेली गाणी म्हणून दाखवून मला कविताप्रिय केला व माझ्या अंगी रसिकता आणली '[४६] असा गौरवपूर्ण अुल्लेख करुन अर्पिले आहे. दुसऱ्या अेका प्रसंगी ते आपल्या आओसंबंधी लिहितात, ' माझी आओ फार भाविक व प्रेमळ होती ... मातृपणाच्या पवित्र कर्तव्यासंबंधाने माझ्या आओसारखी परिपूर्ण बाओ माझ्या पाहण्यात दुसरी आली नाही. '[४७] ही विधाने त्यांच्या मातृप्रेमाची साक्ष पटवितात.

लग्नानंतर कुटुंबाची जबाबदारी अंगावर पडल्यानंतर टिळक जलालपुरला सासरी राहू लागले. जलालपुराहून जवळच असणाऱ्या गंगापुरास त्यावेळी दशावतारी नाटके होत. आपल्या मित्रांच्या आग्रहाने व स्वतःच्या आवडीने टिळक त्यात चोरुन कामे करीत. या नाटकात ते स्वतः रचलेली पदे म्हणत.

टिळकांच्या स्वभावाचा अेक विशेष असा की ' दृष्टीसमोर असेल ते त्यांना जीव की प्राण असे. अेकदा का अेखादी व्यक्ती किंवा काम दृष्टीआड झाले, की मग त्याची त्यांना पुष्कळदा आठवणही राहत नसे... '[४८] ' पांखरा येशील का परतून ? ' ही त्यांची कविता कोणी त्यांनाच अुद्देशून म्हटली असती

तर त्यात वावगे झाले नसते. मनात अेखादा विचार आला की ते त्याची तडक अंमलबजावणी करीत. वडिलांनी मारहाण केली म्हणून ते घरातून पळाले. पुढे आअीचे निधन झाल्यावरही ते मोरखाअयाहून पळाले व जलालपुरात सासरी राहत असताना सासूबाअींनी तक्रार केल्यावर ते तेथूनही पळाले. अशा वेळी त्यांचा सर्वत्र शोध घेतला जाअी व लक्ष्मीबाअी घरी रडत बसत. ` वाऱ्यावरचा तरंग चंचल जाशिल तू मडकून ` असे टिळकांविषयी त्यांना म्हणावेसे वाटे.

टिळकांचे आपल्या पत्नीवर मात्र निस्सीम प्रेम होते. आपले वडील आपल्या पत्नीस खूप त्रास देतात, हे त्यांच्या लक्षात आले होते. म्हणून मुरबाड येथे लक्ष्मीबाअी विरुध्द वडिलांनी केलेल्या तक्रारीकडे त्यांनी अजिबात लक्ष दिले नाही व ते लक्ष्मीबाअींना घेअून तडक मुंबअीस गेले. टिळकांच्या सहानुभूतीचा व प्रेमाचा आधार होता म्हणून लक्ष्मीबाअींना संसाराचे दु:ख व यातना सुसह्य झाल्या.

नानासाहेब पेंडशांच्या घरी असताना टिळकांनी ` माझी भार्या ` हे काव्य लिहिले. या काव्यातहि टिळकांच्या लक्ष्मीबाअी विषयीच्या प्रेमाचे दर्शन घडते. राजनांदगांव सोडून लक्ष्मीबाअी जातात त्या प्रसंगाचा टिळकांनी आपल्या डायरीत केलेला काव्यमय अुल्लेख पाहण्यासारखा हे आहे.

जेव्हा जेव्हा प्रिय मम सखी सोडुनी दूर जाते
तेव्हा तेव्हा स्थिती मम अशी फार वाअीट होते
जी जी गावे त्यजुनि रिघलो चाकऱ्या सर्व ती ती
सोडी भार्याविरहविकला होअुनी चित्तवृत्ती [४९]

टिळकांचे व लक्ष्मीबाअींचे अेकमेकांशी पटत नसले तरी त्यांना अेकमेकांशिवाय करमतही नसे. हे टिळकांनी आपल्या काव्यात मोकळ्या मनाने कबूल केले आहे.

जवळी असता अेक दिवस नच कलहावांचुन गेला ।
जाता दूरी सदा चिंतितो आता मी भार्येला ।। [५०]

टिळक ख्रिस्ती झाल्यावर त्यांना दुसरे लग्न करता आले असते पण लक्ष्मीबाअीवरील त्यांचे प्रेम तिळभरही कमी झालेले नव्हते. लक्ष्मीबाअींनी दत्तूबरोबर आपल्याकडे यावे याचीच त्यांना ओढ लागलेली असे. पंढरपुरात पेंडशांच्याकडे लक्ष्मीबाअी असताना टिळक व लक्ष्मीबाअी अेकमेकांना भेटले व टिळकांनी आपल्या पत्नीस तिचे कुशल विचारले. त्यानंतर लक्ष्मीबाअीस लिहिलेल्या पत्रात ते म्हणतात - `.... परमेश्वर तुला बुध्दि देअील तेव्हा मुलाला घेअून ये. मी मात्र तुझी नेहमी वाट पाहीन. तुम्हाला त्रास होअील असे मी येथून पुढे काही करणार नाही. मी अेकपत्नीव्रताने राहीन. त्याची मुळीच काळजी करु नको.`[५१]

लक्ष्मीबाअींना अेकदा पैशाची गरज होती व भावाबहिणींच्या नकळत त्यांना ते मागायचे होते. त्यावेळी त्यांनी टिळकांना लिहिले, `मी तुम्हाला अेक गुप्त गोष्ट लिहिणार आहे. तरी मला वचन द्या की कुणाला सांगणार नाही म्हणून.` यावर टिळकांनी अुत्तर दिले, `माणूस चुकणारा प्राणि आहे. मोठमोठ्या ऋषीमुनींच्या हातून चुका घडल्या आहेत. झाले त्याबद्दल काहीच वाअीट वाटून घेअू नको. तुला जरी तुझ्या सर्व नातलगांनी किंवा जगाने सोडले तरी मी तुला कधी सोडणार नाही. तू म्हणत असशील तर मी तुला नेण्यास येतो. प्रकृतीला जपत जा.`[५२] लक्ष्मीबाअी हे पत्र वाचून हतबुद्ध तर झाल्याच पण टिळकांचे त्यांच्यावरील अुत्कट प्रेम पाहून त्यांना अत्यंत समाधानही वाटले.

लक्ष्मीबाअींनी आपल्याकडे यावे म्हणून टिळकांचे प्रयत्न अखंडित चालूच होते. लक्ष्मीबाअी पंढरपुरास दिराकडे गेल्यावर टिळकांची तार तेथे आली- `गो सेज फादर कमिंग.` टिळकांना परमेश्वरी कौल मिळाला होता की त्यांची पत्नी त्यांच्याकडे येअील. म्हणून ते पंढरपुरास बाअींच्याकडे येण्यास निघाले होते. त्यांच्या डायरीत पुढील हृदयस्पर्शी अुल्लेख सापडतो...` रात्री दारावरुन बगी गेली की माझे कुटुंब आले आहे म्हणून मी खिडकी अुघडून पहावे।

यात अेक वाजेपर्यंत जागलो । देवा । ह्या दीन दासावर व त्या दीन दासीवर आणि त्या अज्ञ अर्भकावर दया कर. तुझ्याच गौरवार्थ आम्हाला अेकत्र कर. माझा विश्वास आहे ह्या आठवड्यात माझ्या प्रार्थनेचे मला अुत्तर मिळेल." [५३] यावरून पत्नीविरहाने तिळतिळ तुटणाऱ्या टिळकांच्या अंत:करणाची कल्पना येते. अेकदा त्यांना कोणीतरी दुसऱ्या विवाहाची गळ घातली व त्यांच्यासाठी अेक चांगली सुंदर मुलगीही दाखविली. त्यावेळी त्यांनी ' माये मला द्या ' ही कविता लिहिली -

ताऱ्यांची माला । नको मज द्या त्या सुमनाला ।

असे टिळकांनी आपले हृदगत त्या कवितेत व्यक्त केले आहे. निसर्गात विविध प्रकारची फुले असली तरी मला माझे श्यामल फूलच आवडते. त्या फुलाला अुद्देशून ते म्हणतात -

सख्या फुला । मी गाणी गाअीन सदैव रे तुजला । मधुरशी
जीव असे तों अश्रु वाहुनी करिन पूजनाला । तुझ्या मी
विरही तुषिया जळून मरावे हेच पुरे याला । यापुढे
हाच सुखाचा परमावधि झाला.

या कवितेखाली त्यांनी खालील प्रमाणे टीप्पणी दिली आहे.

अेका अेकनिष्ठ पतीस, आपल्या विरहांतरित पत्नीचा त्याग करून दुसरा संबंध करण्याविषयी अेका गृहस्थाने सूचना केली. या सूचनेला हे त्या विरहव्याकुळ दीन व प्रेमळ पतीचे अुत्तर आहे. [५४] लक्ष्मीबाअी टिळकांकडे परतल्यावरही टिळकांनी त्यांना दिलासा दिला, " मी तुला कधीच जुलमाने ख्रिस्ती करणार नाही. मला तो धर्म आवडला म्हणून मी तो स्वीकारला. तुला आवडला व तू ख्रिस्ती झालीस तर मला आनंद वाटेल. पण मी कधी जुलूम करणार नाही." [५५] यावरून टिळकांचे विशाल अंत:करण व पत्नीबद्दल असणारी त्यांची अपार सहानुभूती यांचे दर्शन घडते.

आपल्या बायकोने लेखिका, कवयित्री, वक्ती व्हावे अशी त्यांची अिच्छा होती. " वक्तृत्व, कवित्व, कीर्तन, फार काय पोहणेसुद्धा टिळकांनी त्यांना शिकविले आहे." [५६] अशी माहिती अशोक देवदत्त टिळकांनी दिली आहे. कीर्तनकार लक्ष्मीबाअींचा निर्देश ते " बोवा " म्हणून करायचे. " गुरु तो गुडही रहे चेला शक्कर भये या शब्दांनी ते नेहमी त्यांचे कौतुक करायचे.

टिळकांचे लक्ष्मीबाअीवर अितके प्रेम होते की त्यांनी आपल्या मृत्यूपत्रात त्यांना आवडणाऱ्या माणसांची जी यादी दिली आहे तिचा आरंभच मुळी " मला आवडणारी माणसे १ माझी बायको " [५७] असा केला आहे.

लक्ष्मीबाअी टिळकांनी सांगितलेल्या आठवणीतून टिळकांच्या स्वभावाचे विविध पैलू दृष्टोत्पत्तीस येतात. टिळकांना बोलण्याचा फार नाद असे. आपल्या मित्रमंडळीबरोबर बोलत असताना त्यांना वेळेचे भान राहत नसे. अेकदा नाशिकरोड स्टेशनवरून गाडी धरण्यासाठी टिळक व लक्ष्मीबाअी स्टेशनवर आले. लक्ष्मीबाअींना सामानासह प्लॅटफॉर्मवर बसवून ते तिकीट आणायास निघून गेले. गाडी आली, लक्ष्मीबाअी गाडीत बसल्या. गाडीने शिट्टी दिली तेव्हा त्या भराभर सामान फेकून अुडी मारून खाली अुतरल्या. गाडी निघून गेली, तेव्हा टिळक पलीकडच्या प्लॅटफॉर्मवर कोणाशी वादविवाद करण्यात गर्क झालेले त्यांना दिसले !

टिळकांच्या विसराळूपणाचेही काही किस्से लक्ष्मीबाअींनी सांगितले आहेत. टिळकांच्या न चीजवस्तू नेहमी हरवत. दात, आगपेटी, टोपी, चष्मा, पट्टा या चारपाच जिनसा नेहमीच त्यांच्या हातातून निसटत. या वस्तू जणू त्यांच्याशी लपंडाव खेळायच्या व त्या हुडकण्यासाठी घरातील लोकांच्या फुगड्या सुरू व्हायच्या. कित्येक वेळा टिळकांना टोपीवाचून जावे लागे. पट्ट्याअैवजी दोरखंड कमरेला गुंडाळावे लागे. " माझी व्यवस्था कोणीच ठेवीत नाही. जे ते आपल्याच व्यवसायात दंग । माझी कोणाला पर्वाच नाही ।" [५८] असे ते म्हणायचे.

अेकदा त्यांचे दात हरवल्यावर सारे सरपण अुपसून त्यांनी ते कंपाअुंडच्या बाहेर फेकावयास लावले. शेवटी दातांचा डबा सापडला टेबलावर ! अेकदा त्यांची टोपी हरवली तेव्हा चिडून त्यांनी त्यांचा कोट रागाने जमिनीवर आदळला व त्यावर घरातील अितर कपड्यांचा ढीग केला. शेवटी या ढिगाखाली फेकलेल्या कोटातच त्यांची टोपी सापडली.

टिळकांच्या कोपिष्ट स्वभावाचेही लक्ष्मीबाअींनी काही प्रसंगातून दर्शन घडविले आहे. अेकदा सोंगट्या खेळताना टिळकावर डाव अुलटू लागला व लक्ष्मीबाअी हसू लागल्या. तेव्हा चिडलेल्या टिळकांनी त्यांना जिन्यातून खाली ढकलून दिले होते. दुसऱ्या अेका प्रसंगी टिळक, लक्ष्मीबाअी, बालकवी ठोंबरे अि. सोंगट्या खेळत असताना टिळकांना सरशी होण्यासाठी 'दोन' पडावयास हवे होते. त्यांनी कवड्या टाकल्या, पण अेक कवडी पडली अुताणी व अेक पडली कुशीवर. टिळक म्हणू लागले 'दोन' पडले व लक्ष्मीबाअी म्हणू लागल्या 'दहा' पडले. टिळकांनी बालकवींना विचारले, 'काय आहेत रे हे ?' ठोंबरे म्हणाले, 'हे दोनही नाहीत आणि दहाही नाहीत, दीड आहे !'[५९] टिळकांनी शेवटी सोंगट्या, पट, कवड्या ही सारी घरासमोरील कंपाअुंडांत फेकून दिली.

अेकदा त्यांनी तांदळाच्या अैवजी अेक सुंदर काचेची दौत विकत आणली व लक्ष्मीबाअी रागावल्यावर ती दौत फेकून दिली व वर 'तुला मानसशास्त्र समजत नाही'[६०] असा शेरा मारला. टिळकांनी ख्रिस्ती झाल्यावर व लक्ष्मीबाअी त्यांच्याकडे परतल्यावर काचेचे खूपच सामान विकत घेतले. त्याबद्दल लक्ष्मीबाअींनी नापसंती व्यक्त केली. तेव्हा देखील लक्ष्मीबाअींना "तुला 'अॅप्रिसिअेशन' नाही'[६१] असा शेरा मिळालाच.

राहुरी येथे असताना अेकदा रात्री पुस्तकांच्या कपाटावर ठेवलेला सायकलचा दिवा भडकून मोठा जाळ झाला. सर्वजण तेथे धावून गेले. लक्ष्मीबाअींनी दत्तूला दिव्यावर राख टाकण्यास सांगितले, तर टिळक पाणी टाकण्यास सांगत होते. शेवटी दत्तूने दिवा खाली पाडला व त्यावर राख टाकून तो विझविला. टिळकांना यात आपला अपमान झाल्यासारखे वाटले व ते दत्तूला खूप रागावले. ' माझे घर जळेल. मी मालक आहे. ' [६२] असे अुद्‌गारही त्यांनी रागाच्याभरात काढले. शेवटी त्यांची चूक त्यांना अुमगली व ' तोंवरि संताप, संताप । जोंवरि पदरी पाप ' असे काव्य * त्यांनी लिहिले.

राहुरी सोडून नगरास आल्यावर टिळकांना वेब्स्टरच्या डिक्शनरीची आठवण झाली. टिळकांना वाटू लागले की दत्तूनेच डिक्शनरी गहाळ केली. पण दत्तू म्हणू लागला की ती राहुरीमध्येच राहिली. टिळक संतापले व त्यांनी दत्तूवर खोटे बोलण्याचा आळ घेअून त्याच्या पाठीवर पुस्तके फेकण्यास सुरुवात केली व तोंडाने बडबड करु लागले की, " मी - तुझ्या - हातात - डिक्शनरी - पाहिली - होती. मला खोटे ठरवितोस ? तुम्ही सर्वांनी मिळून विचारच केला आहे का की माझा पाणअुतारा करायचा ! " [६३] मात्र दोन महिन्यांनी राहुरीस त्यांना ती डिक्शनरी तेथेच असल्याचे आढळले व नगरास परत आल्यावर त्यांनी दत्तूची क्षमा मागितली. त्यानंतर दत्तूच्या अंगाला शेवटपर्यंत त्यांनी कधी बोट लावले नाही.

महादेवभाअुजी व टिळक यांच्या स्वभावाबद्दल लक्ष्मीबाअी म्हणतात, " राग, प्रेमळपणा, दयालुत्व व थोडासा विक्षिप्तपणा ही सारी ह्या दोघांही भावांच्या अंगी होती. " [६४] सबंध ' स्मृतिचित्रे ' मध्ये टिळक व लक्ष्मीबाअींच्या परस्परविरुध्द स्वभावाचे अनेक दाखले सापडतात. म्हणून प्रभाकर पाध्ये म्हणतात, " नारायण वामनांचा तालेवार संतापीपणा आणि लक्ष्मीबाअींचा सोशिक विनोद यांच्या संसाराची संघर्षचित्रे म्हणजेच ही स्मृतिचित्रे प्रामुख्याने होत. " [६५]

टिळक व लक्ष्मीबाआी यांच्यात खटके अुडत असले तरी त्या अुभयतांच्या प्रेमात कधीच अंतर पडले नाही. अनेकदा अशा कलहातून टिळकांची कविता जन्मली आहे. टिळक दाम्पत्याच्या लहान-सहान भांडणामागे परस्परानुरति आणि क्रीडावृत्ति दिसून येते.

टिळकांची विनोदाबद्दल विशेष ख्याती नव्हती. लक्ष्मीबाआीच त्यांच्या विनोदबुध्दी विषयी प्रसिध्द होत्या. ` ते विव्दान मी विनोदी. पण त्यांची विव्दत्ता माझ्या विनोदाच्या आड येत नसे व माझा विनोद त्यांना त्रास देत नसे.` [६६] हे लक्ष्मीबाआींचे विधान त्यादृष्टीने अर्थपूर्ण आहे. तथापि टिळकांना विनोदाचे वावडे नव्हते, हे ` स्मृतिचित्रा ` तून दिसून येते.

राहुरीस रहात असताना लक्ष्मीबाआींची बापू नामाजी आढाव या ख्रिस्ती गृहस्थाशी भेट झाली. त्यांचे वागणे, कपडे वगैरे अगदी शुचिर्भूत ब्राम्हणासारखे असे. लक्ष्मीबाआींनी टिळकांना विचारले - ` हे कोण ब्राम्हण आहेत हो ? ` टिळकांनी सांगितले, ` हे गुडशस्त ब्राम्हण आहेत ।` [६७] लक्ष्मीबाआींनी देशस्थ, कोंकणस्थ, क-हाडे वगैरे ब्राम्हणांच्या पोटजाती अैकल्या होत्या पण ही जात मात्र कधी अैकली नव्हती. त्यामुळे त्यांना टिळकांचे बोलणे त्यावेळी पटले. गुडशस्त ब्राम्हणाचा अर्थ पुढे कित्येक वर्षांनी त्यांना कळला. गुडसा - म्हणजे जनावराचे नळीचे हाड - या शब्दावरून टिळकांनी गुडशस्त हा शब्द तयार केला होता. गुडशस्त म्हणजे हाडे ठोकणारे !

पेंडशांच्या घरी असताना अेका ज्योतिषीबुवाने टिळकांचा हात पाहिला व ` विद्येच्या नावाने शंख ! पैसा मुळीच नाही ! लग्न होणार नाही ` असे भविष्य वर्तविले. त्या आगोदर टिळकांनी घारूताआीवर अेक कविता लिहून तिला हवे असणारे दागिने काव्यरूपाने अर्पण केले होते. त्यावर घारूताआीला जरी समाधान वाटले तरी भिकूताआी मात्र फार दु:खी झाल्या व अुव्देगाने,

` अितका शिकला पढला, पण पदरी अेक रुकासुध्दा नाही, अेखाद्या नगड दरवेशाप्रमाणे बायकोला घेअून दारोदार फिरतात ! घरात नेहमी नकारघंटा असते, करायचे काय ! बांगड्या भरा त्याला ` [६८] असे अुद्गार काढले. टिळकांनी ते अैकले व रात्री कीर्तन करीत असताना ज्योतिषीबुवांना व भिकूताअींना अुद्देशून पदे म्हणून दोघांची फजिती केली. त्यांनी ` माझे ग्रह फिरले ग्रह फिरले ` हे पद ज्योतिषीबुवाना अुद्देशून तर ` वेडा झालो खरा गड्यांनो वेडा झालो खरा ` हे पद भिकूताअींना अुद्देशून म्हटले.

राहुरीस वास्तव्य असताना अेकदा टिळक पती-पत्नीचे खटके अुडाले व लक्ष्मीबाअींनी अबोला धरला. त्या रात्री टिळक लिहीत बसले व लक्ष्मीबाअी रडत बसल्या. सकाळचा चहाही मुकाट्याने झाला. त्यानंतर टिळक सायकल घेअून बाहेर पडले व त्यांनी घरोघर जाअून बायांना लक्ष्मीबाअींच्या नावाने आमंत्रण दिले. त्या अुठून बघतात तो बायांचा घोळका. त्यांना कळेना हा काय प्रकार आहे. शेवटी सावित्रीबाअी ओहोळांनी त्यांना चहाच्या निमंत्रणाचे सांगितले व नंतर लक्ष्मीबाअींनी सर्व कार्यक्रम अुरकला. टिळक आल्यावर लक्ष्मीबाअी म्हणाल्या,

` का हो बायांना बोलाकले ! `

` मग तू अबोला धरलास तर तुला बोलायला कसे लावायचे ! ` [६९]

टिळक अुत्तरले. त्यानंतर त्यांचा अबोला सुटला.

वरील प्रसंगातून टिळकांच्या विनोदबुध्दीचे दर्शन घडते. म्हणूनच ` टिळकांपाशी विनोदबुध्दी नव्हती, कारण विनोदबुध्दीचे त्यांच्या अहंकाराशी पटणे शक्यच नव्हते, ` [७०] या प्रमाणे पाध्ये यांच्या मताशी सहमत होणे कठीण आहे.

टिळकांच्या जीवनाचा प्रवास संतत्वाच्या दिशेने चालू होता. त्यामुळे त्यांना संसाराचा मोह तसा नव्हताच. पैशाचीही त्यांना पर्वा नसायची. ' निस्पृहस्य तृणं जगत् ' अशी त्यांची वृत्ती होती. ते नेहमी प्रार्थना करीत, 'देवा , मला नेहमी दरिद्री ठेव. मला पैसा नको.' ७१ ' ह्या पैशाचे नकोत अमुच्या करांस हृदया चटके ' अशी अेक कविताही त्यांनी लिहिली आहे. पैसे आले की ते अितरासाठी खर्चून टाकत. लक्ष्मीबाअी मात्र व्यवहारी होत्या. ' देवा मला कर्ज नको ' ही त्यांची प्रार्थना असे. देव दोघांच्याही प्रार्थना अैकत असे.

सातार्‍यास दुष्काळाच्या मागोमाग दुखणे सुरु झाले. मानमोडीचा रोग पसरला. त्यावेळी टिळकांनी अल्प दवाखाना व स्वल्प अन्नछात्र खुले केले. औषध व अन्नपदार्थ गोरगरीबांना वाटून त्यांनी त्यांचा दुवा घेतला. अशा प्रसंगातून टिळकांची मानवजातीबद्दलची कणवच दिसून येते.

नगरला प्लेग झाल्यावर टिळक सपत्नीक सेग्रिगेशन कॅम्पमध्ये राहून रोग्यांची सेवा करीत. रोग्यांचे ' खाणे-पिणे, औषधपाणी, त्यांची तोंडे धुणे, त्यांना स्पंजबाथ देणे व वेळ पडली म्हणजे त्यांचा शेणगोठा करणे, ' ही कामे ते करीत. अशावेळी ही त्यांच्यावर टीका करणारे काही निंदक होते पण ' कामाच्या आवडीपुढे त्यांना मानापमानाची पर्वा नसे, तशीच कीर्तीचीही पर्वा नसे ७२ असे लक्ष्मीबाअी सांगतात.

राहुरी येथे मि. फेअरबँक यांच्या सहाय्याने टिळकांनी घर बांधले. तेथे टिळकांनी शेतीचे प्रयोग केले. हरबरा चांगला पिकला पण तो लोकांनीच खाल्ला. दोन पायली हरबरा पेरुन दोन शेर हरबरा घरी आला. याठिकाणीच टिळकांनी देवाचे काम पैसे घेअून करायचे नाही, असे ठरविले व मिशनचे काम सोडून दिले. ' व्हालंटियर्स ' जमा करुन त्यांनी अेक संघ स्थापण्याचे ठरविले. ~~या ' व्हालंटियर्स~~

~~जमा करून त्यांनी अेक संघ स्थापण्याचे ठरविले~~. या `व्हालंटियर्स `साठीही त्यांना खूप झीज सोसावी लागली. टिळकांच्या या अव्यवहारी स्वभावाचा त्रास लक्ष्मीबाअींना होत असे. मिशनच्या वार्षिक सभेला येणाऱ्या सर्व मंडळींना तीन वेळचे जेवणाचे व चहाचे आमंत्रण टिळकांनी दिले. त्यापूर्वी घरात काय कमीजास्त आहे याची चौकशीही केली नाही. अशावेळी लक्ष्मीबाअींशी त्यांचे खटके अुडत. टिळकांच्या मागे `गोसावी, बैरागी, बोके संन्यासी` नेहमी गोळा होत व ते टिळकांच्या मानवतावादी व निष्कपट वृत्तीचा फायदा घेअून त्यांना लुबाडीत. अशा लोकांना वठणीवर आणण्याचे काम लक्ष्मीबाअींना करावे लागे.

टिळक फार अुदार वृत्तीचे होते. वणीस असताना देवीच्या धर्मशाळेत जाअून टिळक सापडतील त्या भुकेल्या माणसांना अन्नपाणी आणून द्यायचे, कोणाला कपडे तर कोणाला औषधपाणी द्यायचे. नागपूरला त्यांनी फटाक्याचे दुकान काढले पण बालमित्रांसमवेत सर्व फटाके अुडवून टाकले. राहुरीस बांधलेले घर, शेत - विहिरीसह त्यांनी विकून टाकले व आलेली रक्कम अेका गृहस्थाला त्याचे कर्ज फेडण्यास दिली. लक्ष्मीबाअींच्या मनाची खूप तगमग झाली. त्या लिहितात - `घर गेले. घर बांधून देणारे गेले - घेणारे गेले. डोळ्यांचे पाणी गेले. आठवणी मात्र पाणीदार अजून आहेत.`[७३] टिळक वारंवार स्थलांतर करीत. अशावेळी घर बदलणे भाग असे. पण घर सोडताना टिळक घरातील सामान कुणालाही देअून टाकीत.

टिळकांच्या लहरी, विक्षिप्त स्वभावाचे नमुनेही लक्ष्मीबाअींनी वाचकापुढे ठेवलेले आहेत. राहुरीचे घर विकल्यानंतर टिळकांनी अेक म्हैस घेतली. तिच्या शेणाच्या गोवऱ्या वाळत टाकल्या की चोरीला जात. टिळकांनी त्यावर अेक युक्ती सुचविली. अेक मोठे चुलंगण करून त्यावर पत्रा ठेवून गोवऱ्या भाजाव्यात.

यावर सर्वजण हसू लागले. टिळकांना मात्र खूप राग आला. घराच्या दारासमोर खड्डा खणला आणि त्यावर पत्रावळ टाकून तो झाकला म्हणजे चोर त्यात पडेल अशी भाबडी कल्पनाही त्यांना अेकदा सुचली होती.

धर्मान्तर ही टिळकांच्या आयुष्यातील तसेच तत्कालीन महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनातील अेक महत्वाची घटना होय. विविध धर्मतत्वांचा अभ्यास करीत असताना ख्रिस्ती वाङ्मयाने त्यांच्या मनाला शांती लाभू लागली. त्यामुळे त्यांच्या मनाचा कल ख्रिस्ती धर्माकडे होअू लागला. `हिन्दुधर्माचा यथानुशक्ति शोध करीत असता वेद वेदान्त वगैरेने किंवा महमदी धर्माची माहिती मिळवीत असता अत्यंत आवेशी मुसलमानांच्या भाषणाने जो आनंद झाला नाही, तो ही ख्रिस्ती पुस्तके वाचीत असता मला होत आहे.` [७४] असे टिळकांनी आपल्या डायरीत लिहून ठेवले आहे. नानासाहेब पेंडसे, श्रीमंत आप्पासाहेब बुटी व अितर अनेकांनी त्यांचे मन वळविण्याचा प्रयत्न केला, पण तो व्यर्थ ठरला. द्रव्याचा, अिस्टेटीचा वा कुटुंबाला तहह्यात पोसण्याचा त्यांचा देकार टिळकांना धर्मान्तरापासून परावृत्त करु शकला नाही. १० फेब्रु. १८९५ रोजी त्यांनी मुंबअीस अमेरिकन मिशनच्या भजनालयात बाप्तिस्मा घेतला व ते ख्रिस्ती झाले. `टिळक संत होण्याच्या प्रयत्नांतली अेक पायरी म्हणून ख्रिस्ती झाले.` [७५] असे टिळकांच्या धर्मान्तरावर गंगाधर गाडगीळ यांनी भाष्य केले आहे. आपण ख्रिस्ती झालो तरी आपली अुत्कट स्वदेशभक्ति कायमच राहील याची ग्वाही `त्यांनी `स्वदेशाभिमान `या कवितेत दिली आहे.

रविप्रकाशे कमल वाढतें परि नच सोडि जलाला ।
ख्रिस्तयशोरत झालों तरि मी सोडि न जन्मघरेला ।। [७६]

आपल्या मृत्युपत्रातही त्यांनी `मी जितकी आपल्या देशावर प्रीति करतो तितकी मी आपल्या आअीबापांवर , बायकोवर, लेकरांवर, मित्रांवर ,

फार काय स्वत:वरहि केलेली नाही `[७७].... असे लिहून ठेवले आहे.

टिळक हे तसे ` मुला-फुलांचे कवी ` म्हणून ओळखले जातात. पण त्यांनी ख्रिस्ती झाल्यावर पुष्कळ भजने व अभंग लिहिले. पुढे ` अभंगांजलि ` म्हणून ते पुस्तकरुपाने प्रसिध्द झाले. अनेक कवींच्या भक्तीपर कवनांचा अेक संग्रह ` अुपासना संगीत ` या नावाने त्यांनी संपादित केला. भजन कीर्तनाप्रमाणे पुराण सांगणे ख्रिस्ती समाजात रुढ व्हावे म्हणून त्यांनी ` ख्रिस्तायन ` लिहिण्यास आरंभ केला. टिळकांच्या भजनांचा अेक संग्रह ` भजनसंग्रह `या नावाने पं. रमाबाअींनी प्रसिध्द केला. याशिवाय ` ज्ञानोदय ` या ख्रिस्ती पत्राचे संपादनही टिळकांनी सतत आठ वर्षे केले. टिळकांच्या धर्मान्तराने त्यांच्या जीवनाप्रमाणे त्यांच्या लेखनाचीही दिशा बदलली.

टिळक ख्रिस्ती झाले तरी त्यांची स्वतंत्रबुध्दी त्यांना सोडून गेली नाही. वेळप्रसंगी गो-या मिशन-यांना देखील त्यांची परखड मते अैकून घ्यावी लागत. टिळक ख्रिस्ती झाले तेव्हा ` मी हिंदी माणसाच्या हातून बाप्तिस्मा घेणार ` असा आग्रह त्यांनी धरला व गो-या मिशन-यांना तो मान्य करावा लागला. देवाचे काम पैसे घेअून करायचे नाही, असे ठरवून त्यांनी ` व्हालंटियर्स ` संघटना सुरु केली. ही देखील मिशन-यावर अप्रत्यक्षपणे टीकाच होती. पण टिळकापुढे ते निमूटपणे गप्प बसले. मद्रास येथे ते अुपासना चालवायला गेले असताना त्यांना अस्पृश्य ख्रिस्ती चर्चबाहेर बसलेले दिसले, तेव्हा तेही त्यांच्यामध्ये जाअून बसले. हा त्यांचा निषेधही मिशन-यांना खपवून घ्यावा लागला. हिंदी ख्रिस्ती लोकांच्या दुर्गुणांची व मिशनरींनी त्यांना आणलेल्या पांगळेपणाची त्यांना चीड येअी. यावर अेकदा आवेगाने बोलताना टिळकांनी मूठ आपटल्यामुळे टेबल फुटले होते.

ख्रिश्चन लोक दफनविधीच्या वेळी काळा पोषाख करतात, पण ही पध्दतही टिळकांना रुचलेली नव्हती. ` काळी गाडी , काळा घोडा, काळी पेटी, काळे लुगडे, काळ्या फिती, पत्रामोवती काळी बॉर्डर ! हे [redacted] आहे काय ! देवाकडे जाणे हे का अशुभ आहे ? ` [७८] असे ते म्हणत. मृत्यूनंतर ` मला सर्व शुभ्र असू द्या ` अशी सूचना त्यांनी लक्ष्मीबाईंना देऊन ठेवलेली होती. टिळक अंगात भगवी कफनी घालीत, हातात चिपळ्या व पायात चाळ बांधून नाचत व अितरांनाही आपल्याबरोबर नाचवीत. हा सर्व प्रकार तत्कालीन ख्रिस्ती धर्मीयांना नवीन व चमत्कारिक वाटला असेल, पण आपल्या बुध्दीचा कौल मिळाल्यावर टिळक अितर गोष्टींची पर्वा करीत नसत. अगदी लहानपणी सुध्दा देशातील जातिभेदाची चीड येऊन ` अैकंदर दानधर्माचा मक्ता ब्राम्हणांकडेच का ? ` [७९] या विषयावर ते बोलले होते.

टिळकांचे मृत्युपत्र त्यांच्या धीरोदात्त मनोवृत्तीचे दर्शन घडविते. कालमर्यादा ही जीविताची व्याख्या नसून अुपयुक्त कार्यकर्तृत्व ही आहे, असे प्रतिपादन त्यांनी आपल्या मृत्युपत्रात केले आहे. आप्तमित्रांनी आपली कबर अुभारल्यास त्यावर ` पुष्कळ अजुनी अुणा । प्रभु, मी पुष्कळ अजुनी अुणा ।। ` हा चरण कोरावा, आपले नाव मराठीत लिहावे व त्याच्या अगोदर रेव्हरंड अगर मि. अगर रा.रा. असे अुपपद लावू नये, अशा सूचना त्यांनी दिल्या आहेत. त्यातून त्यांच्या ऋजु स्वभावाचे दर्शन ` घडते. मृत्यूबद्दलची त्यांची कल्पनाही अत्यंत भव्योदात्त अशी आहे, ते म्हणतात, ` देवाज्ञेला मी कधीही ` मृत्यु ` म्हणणार नाही, कारण ती देवाची आज्ञा आहे. ती नवजीवनजागृती आहे.` [८०] मृत्यूनंतर आपले दहन करावे, अशीही सूचना त्यांनी केली आहे. ९ मे १९१९ रोजी टिळक ख्रिस्तवासी झाले. त्यांच्या अंत्ययात्रेत भजनी मंडळीने टिळकांचेच भजन -

मग काय तया प्रभु ज्याचा रे - म्हटले. " त्याचे सूर व शब्द आज सोळा वर्षे झाली आहेत, तरी माझ्या कानात तसेच घुमत आहेत असे वाटते." [८१] अशा हृदयद्रावक शब्दात लक्ष्मीबाअींनी या प्रसंगाचे वर्णन केले आहे.

टिळकांच्या स्वभावातील, वागण्यातील अंतरविरोधाचे चित्रण लक्ष्मीबाअींनी अगदी सहजपणे केले आहे. अेका संतापी, नादिष्ट, अव्यवहारी पण कविहृदयी पुरुषाच्या संतत्वाच्या दिशेने चाललेल्या प्रवासाचे चित्रण यथातथ्यपणे करण्यास लक्ष्मीबाअींच्या लेखणीस अपूर्व यश मिळाले आहे.

रेव्ह. टिळक व लक्ष्मीबाअी यांच्या व्यक्तिरेखा हे ` स्मृतिचित्रे ` चे मुख्य आकर्षण आहे. " ` स्मृतिचित्रे ` वाचीत असताना लक्ष्मीबाअी व ना.वा. टिळक यांच्या व्यक्तिरेखा साक्षात् आपल्या डोळ्यांसमोर अुभ्या राहतात अितके त्यांचे चित्रण जिवंत झालेले आहे." [८२] हा अ.ना. देशपांडे यांचा अभिप्राय लक्ष्मीबाअी टिळकांच्या व्यक्तिचित्रण कौशल्याची साक्ष देणारा आहे. आत्मचरित्रामध्ये केवळ चरित्रनायकाचे वा चरित्रनायिकेचे चित्रण येणे अुपयोगाचे नसून त्यांच्या जीवनाशी संबंधित असणाऱ्या त्यांच्या आप्त-स्वकीयांचे, मित्रमंडळीचेही चित्रण असावयास हवे. त्यामुळे आत्मचरित्रलेखकाचेच व्यक्तिमत्व अधिक अुजळून निघाल्याशिवाय रहात नाही. या संदर्भात लक्ष्मणराव चिपळूणकरांनी आपले ज्येष्ठ बंधू विष्णुशास्त्री चिपळूणकरांच्या चरित्रलेखनानिमित्ताने व्यक्त केलेले विचार महत्वाचे वाटतात. ते म्हणतात, " ज्याप्रमाणे फोटोग्राफमध्ये अेखाद्या प्रसिध्द पुरुषाचे अेकट्याचेच चित्र न काढता त्याच्या भोवतालील मंडळी काही त्याच्या शेजारी बसलेली, काही मागे अंमळ दूर व काही त्याहीपेक्षा मागे अुभी राहिलेली अशी - दाखविल्याने मूळ मुख्य पुरुषाचे चित्र अधिक खुलते, त्याप्रमाणे चरित्रनायकाच्या आप्त, स्नेही वगैरे मंडळींच्या थोड्याबहुत वर्णनाने मूळ पुरुषाचा स्वभाव, त्याचे गुणावगुण वगैरे गोष्टी अधिक चांगल्या लक्षात येतात." [८३]

' स्मृतिचित्रे ' ही केवळ ना.वा. टिळक व लक्ष्मीबाई यांच्या सहजीवनाची कहाणी नसून एका विशिष्ट काळातील समाज व त्यातील भिन्न भिन्न प्रकृतीचे स्त्रीपुरुष यांचे दर्शनही त्यात घडते. लक्ष्मीबाई या बहिर्मुख वृत्तीच्या असल्याने सहवासात आलेल्या प्रत्येक व्यक्तीचे गुणदोष त्यांनी आपल्या तीव्र निरीक्षणशक्तीने टिपून घेतले आहेत, व त्यांची छोटी छोटी स्वभावचित्रे समजुतीने व प्रभावीपणे चितारुन त्यांना अविस्मरणीय करुन ठेवले आहे.

३. नाना गोखले -
-------------

लक्ष्मीबाईंनी आपली आत्मकथा बालपणापासून सांगावयास सुरुवात केल्याने सहाजिकच त्यांच्या वडिलांचे - नाना गोखल्यांचे - व्यक्तिचित्रण प्रथम लक्ष वेधून घेते. संसाराच्या ऐन भराच्या काळात त्यांना सोवळे वाले होते. आपल्या सासऱ्यांना ते पितृस्थानी मानीत व त्यांचे सासरेही ( वासुदेव भगवंत जोगळेकर ) त्यांच्यावर पुत्रवत् प्रेम करीत. सत्तावन सालच्या बंडात त्यांना फाशी झाल्यावर नाना पंचवटी तपोवनात गेले. ते जे सकाळी गेले, ते संध्याकाळीच ओलेत्याने परत आले. त्याचे कारणही त्यांनी सांगितले, " मी तपोवनात गेलो होतो, तेथे एक महार तोंड धूत होता आणि त्याचा शिंतोडा माझ्या अंगावर [मुडल] उडाला. मला त्याचा विटाळ झाला आहे. "[८४] १८५७-५८ साली नानांना झालेले हे सोवळे शेवटपर्यंत म्हणजे पंचवीस सव्वीस वर्षे कायम राहिले. त्यांचे सोवळे हे त्यांच्या कर्मठपणाचेच निदर्शक होते.

त्यांचे हे सोवळे फार कडक असे. त्यामुळे केवळ घरदारच ब नव्हे, तर सारा गाव त्रासून गेला होता. त्यांना ब्राम्हणांचा सुध्दा विटाळ व्हायचा. सकाळी बाहेर गेलेले नाना संध्याकाळीच परत यायचे व त्यानंतर सायंसध्या, जपजाप्य व देवपूजा करायचे. स्वयंपाक घरावर ते कडी नजर ठेवून असायचे.

बाहेरुन येणाऱ्या सर्व जिनसा ते धुऊन घेण्यास लावीत. तिखटमीठसुध्दा धुऊन घ्यावे लागे. लक्ष्मीबाओी म्हणतात, " मीठ, साखर धुण्याचे काम जोपर्यंत आओी किंवा आजीकडे असे तोपर्यंत ते कधी विरघळी नव्हती ! "[८५] परंतु मुलांनी नानांची खोड मोडण्याचे ठरविले. त्यांनी मीठ अेका पंचात घालून चांगले भिजविले व तो पंचा खुंटीला टांगून टेवला. थोड्या वेळात मीठ विरघळून गेले. नाना झोळीत पाहतात तो मिठाचा पत्ता नाही. तेव्हापासून मीठ, गूळ, साखर, तेल, तूप या गोष्टी धुऊन घरात घेण्याची आवश्यकता उरली नाही.

शेतातून आलेली धान्याची रास सुध्दा सांठविण्या आधी धुऊन घेतली पाहिजे, असा नानांचा नियम होता. वीस वीस मण धान्य धुणे अशक्यप्राय काम होते. त्यामुळे घरातील स्त्रिया ' लबाडी ' करीत. त्या थोडेसे धान्य धुऊन त्याचा थर सर्व राशीवर घालीत. नाना घरी आल्यावर मुलांच्या जबान्या घेत. मुलांनी जर का खरे सांगितले की घरात गोंधळ सुरु व्हायचा. न धुतलेल्या वस्तू पुन्हा धुऊन काढाव्या लागायच्या व मुलांना नानांचा यथेच्छ मार लसायचा. मुलांना मारल्यामुळे नानांना विटाळ व्हायचा व ते पुन्हा आंघोळ करायचे.

अेकदा नाशीक येथे विक्रीस पाठविण्यासाठी जांबाच्या तीन पाट्या घरी ठेवल्या होत्या. त्या धुतल्या नसल्यामुळे नानांच्या दृष्टीने विटाळल्याच होत्या. मुलांनी ती फळे चोरुन खाण्याचे ठरविले. यावेळी लक्ष्मीबाओी जांब खात असताना घरी आलेल्या नानांच्या दृष्टीस पडल्या व त्यांना खूप मार खावा लागला. दुसऱ्या अेका प्रसंगी लक्ष्मीबाओीच्या हातून वाहुलीच्या लुगड्याचा गव्हाच्या राशीस स्पर्श झाला तेव्हा देखील गहू ' विटाळले ' म्हणून नानांनी लक्ष्मीबाओीस मारले होते. या त्रासाला कंटाळून लक्ष्मीबाओींनी नानांची खोड मोडण्यासाठी गंगेत जीव देण्याचे ठरविले. त्याप्रमाणे त्यांनी गंगेत उडी मारलीही.

SHRI. BA... ...KHARDEKAR LIBRARY ... KOLHAPUR

तथापि जवळच असणाऱ्या अेका सद्गृहस्थाने लक्ष्मीबाअींना ओढून बाहेर काढले म्हणून त्या वाचल्या. या प्रसंगावर मार्मिक भाष्य करताना लक्ष्मीबाअी म्हणतात, "नानांची खोड तर मोडली नाहीच. माझी मात्र पुरी खोड मोडली." ८६

नानांच्या सोवळ्याची पराकाष्ठा त्यांच्या आअीच्या मृत्युप्रसंगी दिसून आली. मृत्युशय्येवर पडलेली आअी, 'नाना, नाना,' म्हणत असतांना त्यांनी तिला निरोप पाठविला की, "थांब, माझी स्नानसंध्या होअीपर्यंत मरू नको !" ८७

नानांच्या सोवळ्याच्या हकीकतीतून नानांचे व्यक्तिचित्र जसे साकार झाले आहे, त्याचप्रमाणे लक्ष्मीबाअींचे बालपणही साकार झाले आहे.

४. <u>भिकूताअी -</u>

भिकूताअी ही लक्ष्मीबाअींची थोरली बहीण. लक्ष्मीबाअी तिच्याहून पंधरा सोळा वर्षांनी लहान होत्या. भिकूताअीचे नानासाहेब पेंडशांशी लग्न झाले होते. नानासाहेब पेंडसे मामलेदार असल्याने भिकूताअींना कोणत्याही गोष्टीची ददात नव्हती. भिकूताअीचे लक्ष्मीबाअीवर खूप प्रेम होते. भिकूताअी सहसा घराबाहेर पडत नसे. अितकेच काय माहेरीसुध्दा जात नसे. पण ती लक्ष्मीबाअींच्या बाळंतपणासाठी जलालपुरास दोन-तीन महिने राहिली होती. भिकूताअीची अेकुलती अेक मुलगी धाकूमाअी लक्ष्मीबाअींना आपल्या बहिणीप्रमाणे वाटे. तिच्या लग्नात लक्ष्मीबाअी व टिळक अगत्याने गेले. पण टिळकांच्या विपन्नावस्थेमुळे लक्ष्मीबाअी रिकाम्या हातानेच आलेल्या होत्या. आपण गरिब असल्यामुळे आपणाकडे कोणी लक्ष देत नाही, असे लक्ष्मीबाअींना वाटू लागले. रात्री सगळीकडे निजानीज झाल्यावर भिकूताअी त्यांना शोधत आल्या. लक्ष्मीबाअी रडून त्यांना म्हणाल्या, "मी तुझी बहीण नाही. तू कशाला आलीस !

माझ्या अंगावर गोठतोडे थोडेच आहेत ? " यावर भिकूताईने दिलेले उत्तर तिच्या समंजस व सहृदय स्वभावावर प्रकाश पाडणारे आहे. ती म्हणाली, " मने, अग वेडे ! तू मला गोठतोड्याहून अधिक मोलाची नाहीस का ? नाना आजी वारल्यापासून आज दोन तीन वर्षांत प्रथमच तू मला भेटत आहेस. मला कसे तुझ्याशी बोलवेल ? काम टाकून पाहुण्यासमोर मी तुझ्याबरोबर रडत बसले, तर ते करणे मला शोभेल का ? " " त्यानंतर तिने तिच्या अंगावरचे सर्व दागिने काढून लक्ष्मीबाईंच्या अंगावर घातले.

भिकूताईचे घर म्हणजे लक्ष्मीबाईंना माहेरच वाटे. त्या ठिकाणी आपला बाहुल्या खेळण्याचा छंद त्यांनी मोठ्या थाटामाटाने पूर्ण केला होता. अर्थात त्याचा सर्व खर्च भिकूताईंनाच सोसावा लागला.

आपल्या लाडक्या बहिणीचा पती काहीही द्रव्यार्जन न करता एका गावाहून दुसऱ्या गावाकडे भटकत असतो, त्याचे संसारात लक्ष नाही, याचे भिकूताईला फार वाईट वाटे. अशा पुरुषाला बांगड्या भरल्या पाहिजेत, असे मत एकदा तिने व्यक्त केले होते.

टिळक ख्रिस्ती झाल्यावर लक्ष्मीबाईंना तर धक्का बसलाच पण भिकूताईलाही जबरदस्त धक्का बसला. वास्तविक पाहता टिळकांच्या धर्मांतराची बातमी कळली तेव्हा ती आजारी होती पण लक्ष्मीबाईंची दुरवस्था (दुखस्था) पाहून तिचा आजार पळाला. लक्ष्मीबाईंची रात्रंदिवस ती काळजी घेऊ लागली. लक्ष्मीबाईंचे दातसुध्दा ती घासत असे. लक्ष्मीबाई वेड्यासारखे करू लागल्या म्हणजे दत्तूसाठी तरी त्यांनी नीट वागावे, असा तिचा उपदेश असे. टिळकांचे बंधू सखाराम भाऊजी टिळकांना खर्चासाठी महिना हं शंभर रुपये पाठवितात पण लक्ष्मीबाईकडे लक्ष देत नाहीत हे पाहून भिकूताईने त्यांची चांगलीच कान उघाडणी केली. यावरून तिच्या स्पष्टवक्तेपणाची कल्पना येते.

ख्रिस्ती झालेले टिळक पत्नीस भेटायास येतात पण ते नेहमीप्रमाणे भिकूताईकडे उतरू शकत नाहीत. त्यांचा मुक्काम धर्मशाळेत असतो. त्यांचा जेवणाचा डबा मात्र भिकूताई पाठविते. त्यावेळी ज्या टिळकांना आपण आपल्या हाताने घरात प्रेमाने जेवायला वाढले, त्यांना दुसऱ्याच्या हातून जेवण पाठवायचे व तेही धर्मशाळेत या विचाराने दु:ख होऊन तिच्या डोळ्यातून गंगा यमुना वाहू लागतात. टिळकावर तिचे प्रेम होते पण ते ख्रिस्ती झाले म्हणूनच तिला त्यांचा राग यायचा.

नानासाहेब पेंडशांची नगरास बदली झाल्यावर भिकूताईने लक्ष्मीबाईंची व्यवस्था आपल्या भावाकडे जलालपुरास करण्याचे ठरविले. सोने नाणे, दागदागिने, खणलुगडी वगैरे सामानाने गच्च भरलेली अेक ट्रंक तिने आपल्या भावजयीच्या स्वाधीन केली व लक्ष्मीबाईंना मनस्ताप घडेल असे वर्तन त्यांच्याहातून घडू नये म्हणून बजावले. ` दत्तूचे दूध बंद करू नका ` [८९] हे तिचे उद्गार तिचे वात्सल्यच प्रकट करणारे आहेत. टिळकांनी स्वधर्मात परत यावे याबद्दल भिकूताई उत्सुक असली तरी ख्रिस्ती झालेल्या पतीकडे लक्ष्मीबाईंनी जाऊ नये यासाठी ती दक्ष होती. म्हणूनच लक्ष्मीबाईंना तिने नगरास न नेता जलालपुरास आणून ठेवले होते. लक्ष्मीबाईंना उद्देशून ` मैना तुझा ग पिंजरा मायेचा ` [९०] हे गाणे ती म्हणत असे. बहिणीसाठी तिचा जीव कसा तिळतिळ तुटत असे, याचा प्रत्यय येथे येतो.

लक्ष्मीबाई ख्रिस्ती झाल्यावर मात्र भिकूताईचे सर्व अवसान गळून पडते. ती बिछान्याला खिळून राहते. आपल्या प्रेमाची, वात्सल्याची व आपण दिलेल्या आधाराची लक्ष्मीबाईने अशी फेड करावी, याचा तिला धक्का बसला. तिच्या स्वभावात कडवटपणा निर्माण झाला. कारण ती जितकी प्रेमळ तितकीच स्वाभिमानी व रागीट होती. नगरला आल्यावर लक्ष्मीबाई तिच्या घरी

जातात तेव्हा ` तिला खोगीर द्या निजायला `[५१] अशा कठोर अुद्गारांनी ती त्यांचे स्वागत करते. भिकूताअीशी लक्ष्मीबाअींची पुन्हा अेकदा भेट होते. त्यावेळी लक्ष्मीबाअी भिकूताअीची प्रकृती पाहण्यास आलेल्या होत्या. भिकूताअी त्यांच्याशी बोलली नाही पण लक्ष्मीबाअी जाण्यास निघाल्या, तेव्हा " त्या महाराणीच्या पदरात टाका काहीतरी "[५२] अेवढेच ती म्हणाली.

बहिणीस खोगीरावर निजावयास लावणारी भिकूताअी पुढे मात्र लक्ष्मीबाअींशी नीट वागू लागली. त्यांना निजावयाला नुसते जाजम दिले म्हणजे ती म्हणे, " का ! ती का वाटेवरची चोर आहे ! तिला चांगला बिछाना द्या निजायला."[५३] लक्ष्मीबाअीविरुध्द कोणी काही बोलले तरी तिला खपत नसे. लक्ष्मीबाअी आपल्या पतीकडे परत गेल्या हेही चांगलेच झाले, असेही ती शेवटी शेवटी म्हणू लागली. भिकूताअींचा मृत्यू नाशिक येथे झाल्यावर ` माझ्यामुळे तिला कष्ट, आजार व शेवटी मृत्यू आला `[५४] हे लक्ष्मीबाअींचे आर्त अुद्गार यथार्थ वाटतात.

बहिणीसाठी खस्ता खाणारी, बहिणीवर आअीसारखी मायेची पाखर घालणारी अेक अत्यंत प्रेमळ, मायाळू पण तितकीच रागीट व स्पष्टवक्ती स्त्री भिकूताअीच्या व्यक्तिचित्रणातून लक्ष्मीबाअींनी साकार केली आहे.

५. <u>वामनराव अुर्फ मामंजी.</u>

हे टिळकांचे वडील व लक्ष्मीबाअींचे सासरे. वामनराव टिळक व्यवसायाने तलाठी होते. टिळकांच्या लग्नाच्या वेळी ` हुंडा घेअून मी मुलाला विकणार नाही ` असे त्यांनी गोविंदराव मामांना सांगितले होते. यावरून त्या काळातही त्यांची याबाबतीत किती पुरोगामी दृष्टी होती, हे दिसून येते. तथापि टिपण जुळले पाहिजे, त्याशिवाय लग्नास संमती देणार नाही, असेही त्यांनी कळविले होते. यातून त्यांचा स्पष्टवक्तेपणा दिसून येतो.

वामनरावांची नीतिमत्ता चांगली होती. बायको मेल्यावर त्यांनी दुसरा विवाह केला नाही व परस्त्रीस नेहमी मातेप्रमाणे मानले. ते स्वयंपाक स्वत: करीत व अितका प्रमाणशीर की जेवणानंतर अेक शीतही शिल्लक रहात नसे.

मामंजीच्या अंगात देवी येत असे. त्यांच्या मनाविरुध्द अेखादी गोष्ट घडली की त्या शुक्रवारी देवी त्यांच्याअंगात यायची व लक्ष्मीबाअी, टिळक व महादेव माअुजी यांच्याविरुध्द आकांडतांडव करायाची. या तिघाबद्दल त्यांचे मत चांगले नव्हते, म्हणून हा प्रकार व्हायचा. दांभिकपणा हाही त्यांचा अेक गुण असल्याचे यावरून दिसून येते. दांभिकपणाच्या जोडीलाच त्यांच्या स्वभावात अंधश्रध्दाही बरीच होती. ' भुतेखेते , जादूटोणा, अंगात येणे, पायगुण, ग्रह, टिपण, हातापायांच्या बोटांची लांबीरुंदी ह्या गोष्टीवर त्यांची माणसांविषयीची आवडनिवड अवलंबून असे.'[१५] टिळकांच्या जन्माच्यावेळी त्यांचे काम गेले होते तर सखाराम माअुजींच्या जन्माच्या वेळेस त्यांचे काम त्यांना नवीन नोकरी लागली होती. त्यामुळे सखाराममाअुजी त्यांना प्रिय तर टिळक अप्रिय ठरले व टिळकांना सावत्र मुलाप्रमाणे त्यांनी वागविले.

अितरावर हुकूमत गाजविण्याची त्यांना आवड होती व नवरेपणाची हुकूमत त्यांनी आपल्या पत्नीवर खूप गाजविली होती. बायको म्हणजे क:पदार्थ ! तिने म्हणेल तसे राबले पाहिजे असा त्यांचा दृष्टिकोन ! या दृष्टिकोणातूनच ' अेवढा हंडा अुतरावयाचा होता '[१६] ही आपल्या पत्नीची विनंती त्यांना अपमानास्पद वाटली व त्यांनी चवताळून जाअून तिला कमरेत लाथ मारली. ती साध्वी त्यानंतर आजारी पडून आठवड्यातच मरण पावली. तिच्या मृत्यूचे पाप त्यांच्याच कपाळी होते. नवरेशाहीच्या दुष्ट प्रवृत्तीतूनच हे निर्दय कृत्य त्यांच्या हातून घडले. लक्ष्मीबाअींचा पायगुण चांगला नाही व त्यामुळे घरातील सुख-शांती नष्ट होणार आहे असे अंगात आलेल्या देवीने त्यांना सांगितल्यापासून

लक्ष्मीबाअींना सासुरवास सुरु झाला. वास्तविक पाहता लक्ष्मीबाअींनी आपल्या सासूबाअींना पाहिलेही नव्हते, पण सासरेच सासुरवास करीत ! लक्ष्मीबाअींना माहित नसणारे कोकणस्थ पध्दतीचे जेवण ते त्यांना करावयास सांगायचे व ते करता आले नाही म्हणजे त्यांचा अुपहास व अपमान करायचे. लक्ष्मीबाअींना थोडाही निवांतपणा मिळू नये म्हणून अेकामागून अेक काम ते सांगायचे. अितके की जेवतानादेखील त्यांना कामे सांगून जेवण करणे अशक्य करुन सोडायचे. टिळकांचे मत लक्ष्मीबाअी विषयी कलुषित व्हावे, असेही प्रयत्न त्यांनी केले. लक्ष्मीबाअींची अेकही हौस पूर्ण होअू नये व त्यांनी सदैव तळमळत रहावे यातच त्यांना आनंद वाटे. नाही म्हणायास त्यांनी लक्ष्मीबाअींच्या अंगाला कधी बोट लावले नाही की त्यांना अुद्देशून कधी अपशब्द वापरले नाहीत, हा त्यांचा चांगुलपणा. लक्ष्मीबाअींच्या प्रापंचिक जीवनातील आरंभाच्या काळातील यातनांचे श्रेय प्रामुख्याने वामनरावांनाच आहे. तथापि लक्ष्मीबाअींनी त्यांच्या दोषाबरोबरच त्यांच्या गुणांचाही अुल्लेख मोठ्या मनाने केला आहे.

## ६. महादेवभाअुजी.

महादेवभाअुजी हे टिळकांचे धाकटे बंधू व वामनरावांचे टिळकांप्रमाणेच नावडते चिरंजीव, लक्ष्मीबाअी व टिळक या दोन ' दुष्ट ग्रहा ' नंतरचा वामनरावांचा तिसरा दुष्ट ग्रह ! महादेवभाअुजींच्या जन्मानंतर लक्ष्मीबाअींच्या सासू वारल्या होत्या. त्यामुळे वामनरावांच्या दृष्टीने ते नतद्रष्ट ठरले. टिळकांप्रमाणेच महादेवभाअुजींनाही वामनरावांकडून सापत्नभावाची वागणूक मिळाली.

टिळकांप्रमाणेच महादेवभाअुजीही तऱ्हेवाअीक व विक्षिप्त. विद्यार्थी म्हणून ते बुध्दिमान असले तरी आपल्या अतिरेकी औदार्यामुळे नेसूचे सोडून देण्याची त्यांची

त्यारी असे. त्यांच्या प्रेमळपणामुळे सारे जगच त्यांना आपले वाटे. अेखादा चिंध्या पांघरलेला गरीब मनुष्य दिसला की आपला सदरा त्याला देअून अुघडे बोडके ते शाळेस जात. अेकेदिवशी महादेवभाअुजी जलालपुरास गेले तेव्हा अेका धोतराखेरीज त्यांच्या अंगावर कांहीसुद्धा नव्हती. डोक्यावर टोपी व पायात वहाणाही नव्हत्या. हे सर्व त्यांनी कोणाला तरी दान करून टाकले होते. पण घरी येअून गाडीत झोपलो असता चोरी झाली, हे खोटेच कारण सांगितले. कोणी अडचणीत दिसला की जवळ असेल ते सर्व देअून टाकायचे व वर अशा थापा मारायच्या, हा त्यांचा स्वभावच होता. नागपुरास लक्ष्मीबाअींनी त्यांच्या सांगण्यावरून त्यांना रेशीमकांठी धोतर घेअून दिले तर ते त्यांनी दोन-चार दिवसातच नाहीसे करून टाकले. सर्व घर शोधले तरी ते सापडेना. दुसऱ्या दिवशी अेक गोंधळी घरी आला, त्याच्या अंगावर ते धोतर होते. तेव्हा कुठे महादेवभाअुजींनी त्याला धोतर दिल्याचे कबूल केले. अेकदा घरातील तांब्याही त्यांनी अेका गरीबाला देअून टाकला. लक्ष्मीबाअींनी दिलेली घावळीही त्यांनी दान करून टाकली होती. या प्रकारामुळे लक्ष्मीबाअी त्यांना रागावत म्हणून महादेवभाअुजी लक्ष्मीबाअींना भिअून असत.

नागपुरास असताना टिळक घरी नसल्यामुळे लक्ष्मीबाअींनी महादेवभाअुजींना दोन रुपये देअून काही सामान आणण्यास सांगितले. महादेवभाअुजींनी बाजारातून दोन रुपयांची फक्त तूपसाखरच आणली. लक्ष्मीबाअी फार संतापल्या, व " आता का नुसती तूपसाखर खाअून दिवस काढायचे ! जा, मी जीवच देते,"[१७] असे रागारागाने म्हणाल्या. त्यानंतर त्या माडीवर जाअून बसल्या. लक्ष्मीबाअी कोठे दिसेना तेव्हा ते बागेतील विहिरीत डोकावून पाहू लागले, व त्यांचा तेथेही पत्ता न लागल्यावर " अग वहिनी ! तू कसा ग जीव दिलास ! आता नानांना मी काय सांगू ! कोठे ग तू जीव दिलास !"[१८] म्हणून मोठमोठ्याने

रडू लागले. असा त्यांचा स्वभाव भोळा व हळवा होता. लक्ष्मीबाअी समोर येताच त्यांचे पाय धरून आपण पुन्हा असे करणार नाही म्हणून त्यांना वचन दिले. तथापि त्यांचा मूळ स्वभाव काही गेला नाही.

वडिलांच्या बाराव्या दिवशी भूक लागली म्हणून त्यांनी बाजारास नेलेल्या पैशातून दोन आण्याची जिलबी घेअून खाल्ली. "तुमचे वडील वारलेले, तुम्ही गोड हो कसें खाल्लें ?" [९९] असे लक्ष्मीबाअींनी रागाने विचारताच 'ते दूर वारले वहिनी' असे त्यांनी अुत्तर दिले. त्यांच्या अशा वागण्याचा लक्ष्मीबाअींना काही अर्थच कळत नसे.

लक्ष्मीबाअींनी अेक पोपट पाळला होता. तो 'मो मो महादेव' अितकेच म्हणत असे. अेके दिवशी तो पाहता पाहता अुडून गेला. मधून मधून तो परत येअी व झाडावर बसून 'मो मो महादेव' असे म्हणे. तो पोपट जसा अुडून गेला तसाच हा पोपटही अेके दिवशी निघून गेला. लग्नाचा विषय काढताच, 'वहिनी, तुम्ही अुगीच कशाला काळजी लावून घेता ?' [१००] असे म्हणणाऱ्या महादेवभाअुजींना जणू आपल्या मरणाची पूर्वकल्पनाच आली होती. 'अशी माणसे देव आपल्याकडे लवकर नेतो' [१०१] असा समर्पक अभिप्राय त्यांच्या निधनानन्तर लक्ष्मीबाअींनी व्यक्त केला आहे.

आपल्या सौम्य, हळव्या, दयाळू स्वभावामुळे प्रिय वाटणारे हे व्यक्तिमत्व त्यांच्या अैन तारुण्यात झालेल्या निधनामुळे मनाला चुटपुट लावल्याखेरीज रहात नाही.

७. <u>सखारामभाअुजी.</u>

सखारामभाअुजी आपल्या वडिलांचे लाडके चिरंजीव होते. कारण त्यांच्या जन्माच्या वेळेस वामनरावांना नवीन नोकरी लागली होती. त्यामुळे ते चांगल्या पायगुणाचे ठरले व वामनरावांकडून त्यांना चांगली वागणूक मिळाली. वामनराव

त्यांना सख्ख्या मुलाप्रमाणे व टिळकांना आणि महादेवभाऊजींना सावत्र मुलांप्रमाणे वागवीत. घरात च्हा झाला तर वामनराव सखारामभाऊजींना जवळ बसवून तो घेत.

टिळक व सखारामभाऊजी दोघे बरोबर शाळेस जात. अेकदा सखारामभाऊजींनी च्हाडी केल्यामुळे टिळकांना वामनरावांनी खूप मारले. त्यामुळे टिळक घर सोडून पळून गेले. टिळक नंतर परत आले तेव्हा मात्र ते त्यांच्या च्हाड्या कमी सांगू लागले, कारण आपल्यामुळेच टिळक पळून गेले याची त्यांना जाणीव झाली. याच वेळी दोघांनाही नारु झाला, तेव्हा वामनराव टिळकांना म्हणत, " चांगले झाले, तू लंगडा झालास तर मला आनंद वाटेल ".[१०२] मात्र सखाराम-भाऊजींची ते प्रेमाने शुश्रूषा करीत, त्यांना पेढा आणून देत. अर्थात यात सखारामभाऊजींचा काहीच दोष नव्हता. वामनरावांच्या मत्सरी स्वभावामुळेच हे घडत असे.

मोठेपणी मात्र सखारामभाऊजींचे बन्धुप्रेम वृद्धिंगत झाले. टिळक ख्रिस्ती झाल्यावर लक्ष्मीबाअींचा मुक्काम पंढरपुरास भिकूताअींकडे होता. त्यावेळी सखारामभाऊजीही पंढरपुरास होते. ते रोज लक्ष्मीबाअींना भेटावयास येत. ते टिळकांना खर्चासाठी दरमहा शंभर रुपये पाठवून देत. मात्र भावजयीची - लक्ष्मीबाअींची - लुगडी फाटली तरी त्याबद्दल काही बोलत नसत. म्हणून भिकूताअींनी त्यांची खूप खरडपट्टी काढली होती. त्यानंतर त्यांनी लक्ष्मीबाअीसाठी अेक लुगडे व दत्तूसाठी दोन कुडती पाठवून दिली. आपल्या ख्रिस्ती झालेल्या भावाबद्दल त्यांचे प्रेम कायमच होते.

टिळकांची मुंबअीस काळजी घेणारा कोणी नाही म्हणून लक्ष्मीबाअींनी त्यांना सूटपत्र द्यावे म्हणजे ते दुसरे लग्न करण्यास मोकळे होतील, अशी सूचना त्यांनी लक्ष्मीबाअींना केली होती. यातून त्यांचे बंन्धुप्रेम दिसून येत असले तरी

लक्ष्मीबाओीबद्दल त्यांना विशेष आपुलकी नव्हती हे स्पष्ट होते. अर्थात लक्ष्मीबाओींनी त्यांची सूचना साफ धुडकावून दिली व त्यांची चांगलीच हजेरी घेतली.

टिळक लक्ष्मीबाओींना नगरास घेऊन जाण्यासाठी पंढरपुरास आले. लक्ष्मीबाओींनी सखारामभाअुजींना जावे का म्हणून विचारल्यावर त्यांनी कानावर हात ठेवले. लक्ष्मीबाओी संबंधी स्वत:वर कोणतीच जबाबदारी घेण्याची त्यांची त्यारी नव्हती.

टिळक राहुरीस असताना सखारामभाअुजीही राहुरीस येऊन वकिली करु लागले. अेकदा टिळकांना त्यांच्या भावजयीने तवा, कढअी वगैरे जिनसा आणावयास सांगितल्या होत्या. टिळकांनी त्या घरी नेऊन दिल्यावर त्यांनी त्या जिनसांची किंमत विचारली. त्यावर टिळकांना राग आला व दोघांचे भांडण झाले. त्यावेळी त्यांनी आपल्या भावास 'हेच तुला माझे शेवटचे पत्र - ह्यापुढे तुला माझे तोंड दृष्टीस पडणार नाही'[१०२] असे पत्र लिहिले. त्याबरोबर सखारामभाअुजी टांग्यातून लगोलग आले. त्यावेळी ते अगदी घामाघूम झाले होते, व त्यांच्या तोंडावर सहा महिन्यांच्या दुखण्याची कळा आली होती. सर्व प्रकार कळल्यावर त्यांना हायसे वाटले व ते घरी गेले. या प्रसंगातून त्यांचे बंधुप्रेम दिसून येते.

टिळकांच्या मृत्यूची बातमी सखारामभाअुजींना प्रवासात कळली. त्यावेळी त्यांची भयंकर स्थिती झाली. मुंबअीतील टिळकांच्या घराचा पत्ताही त्यांना माहित नव्हता. पोटात चहाच्या कपाशिवाय अन्नाचा अेक कणही नसताना अैन अुन्हाळ्यात त्यांना टिळकांचे घर शोधीत हिंडावे लागले. भावाच्या मृत्यूचा त्यांच्या मनावर जो आघात झाला तो शेवटपर्यंत टिकला. टिळकांच्या अस्थींची पेटी चर्चमध्ये आल्यावर अितर अनेकांबरोबर सखारामभाअुजींनीही भाषण केले.

सखारामभाऊंच्या अखेरच्या काळाचे लक्ष्मीबाईंनी फार हृदयस्पर्शी वर्णन केले आहे. भावाच्या मृत्यूने त्यांच्या मेंदूवर परिणाम झाल्याने शेवटी शेवटी ते वाटेल त्याला वाटेल ते बोलू लागले. आपल्या भावाच्या मृत्यूस आपली भावजयच कारणीभूत झाली असेही त्यांना वाटू लागले. अेकदा लक्ष्मीबाईंच्या घरातून रागारागाने ते स्टेशनवर गेले. त्यावेळी त्यांची समजूत काढल्यावर पुन्हा ते परत आले. त्यावेळी त्यांचे व लक्ष्मीबाईंचे भांडण झाले. लक्ष्मीबाई म्हणतात, " आमच्या दीरभावजयांचे हे पहिले व शेवटलेच भांडण "[१०४] त्यानंतर ते पुन्हा निघून गेले व त्यांची व लक्ष्मीबाईंची नंतर गाठ पडली नाही. ते वारल्याची बातमीच त्यांना काही दिवसांनी समजली.

वामनरावांनी प्रेमाने वाढविलेला हा त्यांचा आवडता सुपुत्र वामनरावांकडून सापत्नभावाची वागणूक मिळालेल्या त्यांच्या नावडत्या पुत्रा मागोमागच देवाघरी गेला.

८. डॉ. ह्यूम -

अहमदनगरचे ख्रिस्ती मिशनरी डॉ. ह्यूम हे टिळकांचे जिवाभावाचे स्नेही व सहकारी होते. टिळकांच्या संसाराला त्यांचा मोठाच हातभार लाभला. टिळक ख्रिस्ती झाल्यावर ह्यूमसाहेबांनी त्यांना जवळ जवळ आपल्या घरीच ठेवले होते.

लक्ष्मीबाई टिळकाकडे राहण्यास आल्यावर टिळक ख्रिस्ती झाल्याने त्यांना नगरास कोठेच जागा मिळेना. त्यावेळी ह्यूमसाहेबांनी ख्रिस्ती लोकांच्या वसाहतीत त्यांना जागा दिली. लक्ष्मीबाई अजून ख्रिस्ती झाल्या नव्हत्या, तेव्हा त्यांना ख्रिस्ती लोकांच्या शेजारी रहावयाचे नव्हते. त्यांची अडचण लक्षात घेऊन ह्यूमसाहेबांनी ख्रिस्ती लोकांना घर बदलण्यास सांगितले. त्यांच्या स्वभावातील प्रेमळपणामुळे व सहिष्णुतेमुळेच त्यांनी लक्ष्मीबाईंची सोय करून दिली.

नगरमध्ये प्लेग सुरू झाल्यावर त्यांनी टिळक दाम्पत्याला आपल्या बंगल्यावर राहण्यास बोलाविले. अर्थात तिथे सोवळे पाळता येण्यासारखे नसल्याने लक्ष्मीबाई जाऊ शकल्या नाहीत, टिळक मात्र गेले.

टिळकांच्या खर्चिक स्वभावामुळे त्यांना बऱ्याचवेळा पगार पुरत नसे. अशावेळी डॉ. ह्यूम त्यांना पुढील महिन्याच्या पगारातून 'ॲडव्हान्स' देत असत. लक्ष्मीबाईंना ही 'आगाऊ' बँक वाटे व ही 'आगाऊ' बँक डॉक्टर ह्यूमच्या बंगल्यात होती "[१०५] असे त्या मिस्किलपणे म्हणतात.

दुष्काळात मिशनने काढून टाकलेली मुले टिळकांनी पोसायचे ठरविल्यावर डॉ. ह्यूम साहेबांना टिळकांची फारच काळजी वाटू लागली कारण त्यांची आर्थिक स्थिती त्यांना ठाऊक होती. लक्ष्मीबाई लिहितात, "टिळकांच्या संसारासंबंधी मला जशी इतके दिवस काळजी कळकळ वाटे तशी आता आमच्या दोघांच्या संसारासंबंधी डॉ. ह्यूम यांना वाटू लागली."[१०६] त्यामुळेच टिळकांनी मुले सांभाळणे त्यांना मुळीच आवडले नाही. अर्थात टिळकांवरील निष्कपट प्रेमामुळेच ह्यूमसाहेबांना असे वाटे. त्यामुळे ह्यूम साहेबांनी टिळक दाम्पत्याच्या संसारात ढवळाढवळ केली तरी त्यांना राग येत नसे.

डॉ. ह्यूम यांच्या बोलण्यात 'आता भावा' असे शब्द फार असत. विशेषत: हताश होऊन बोलण्याचा प्रसंग आला म्हणजे ते या शब्दांनी संभाषणाची सुरुवात करीत. त्यांनी टिळक व लक्ष्मीबाईंना मुले सोडून द्या, असे टुमणे लावले. लक्ष्मीबाईंशी झालेल्या त्यांच्या संभाषणातील काही मजेदार वाक्ये पुढील प्रमाणे. ह्यूम म्हणायचे -

" आता भावा - पण तुम्हाला खर्च फार होतो आहे. "

" पण भावा, तुमची अडचण होईल. "

" आता बहिणी, तुम्ही काय म्हणता ते मला समजले नाही. "

" बरं भावा .... तुम्ही या गोष्टीचा चांगला विचार करा. "[१०७]

इंग्रजी भाषेच्या वळणाप्रमाणे मराठी बोलण्याची त्यांची ही पध्दत पाहून मोठी गंमत वाटते. त्याचप्रमाणे या भाषेच्या वैशिष्ट्यामुळे त्यांचे व्यक्तित्व वाचकापुढे साकार होते.

अकरा महिने ही मुले टिळकांनी सांभाळली. पण रोज डॉ.ह्यूम लक्ष्मीबाईंच्या पुढे उलटी टोपी धरून म्हणायचे," आता बहिणी, माझ्या हा टोपीत तुमची मुले टाका. मला भीक घाला."[१०८] लक्ष्मीबाई नकार द्यायच्या. हा फार्स रोज व्हायचा. टिळकांची मजने शब्दांची उलटापालट करून ते म्हणत व गातगातच टिळकांच्या घरात प्रवेश करीत. यातून त्यांच्या प्रसन्न व्यक्तिमत्वाचे दर्शन होते. टिळकांची आर्थिक विवंचना दूर करण्यासाठी ह्यूमसाहेबांनी शेवटी ही मुले स्वत:च्या बोर्डिंगमध्ये ठेवली.

लक्ष्मीबाईंनी मिरजेस जाऊन नर्सिंगचे शिक्षण घेण्याचे ठरविले. पण डॉ. ह्यूमना हे पसंत नव्हते. ते लक्ष्मीबाईस म्हणाले " आता बाई, तुमचे खरे शिक्षण म्हणजे आपल्या नवऱ्याचा व मुलांचा संभाळ करणे, मला वाटते तुम्ही मिरजेस जाऊ नये. "[१०९] पण लक्ष्मीबाईंनी आपला हट्ट सोडला नाही. लक्ष्मीबाई मिरजेस गेल्या म्हणजे टिळकांची व मुलांची गैरसोय होईल म्हणून त्यांनी मिरजेस डॉ. वान्लेस यांना गुप्तपणे पत्र लिहून लक्ष्मीबाईंना परत बोलावण्याची व्यवस्था केली. टिळकांनी मिशनचे काम पगार घेऊन करायचे

नाही, असे ठरवून मिशनची नोकरी सोडली, व व्हालेंटिअर्स संघटना काढली. नोकरी असताना टिळकांना पगार पुरायचा नाही, तेव्हा नोकरी सोडल्यावर त्यांचे कसे भागणार, हे लक्षात घेऊन ह्यूमसाहेबांनी ट्रॅक्ट सोसायटीकडे खटपट करून शंभर रुपये मासिक वेतनाचे संपादकीय काम टिळकांना मिळवून दिले.

टिळकांनी अेखाद्या शांत स्थळी जाऊन ख्रिस्तायन पूर्ण करण्याचे ठरविले, तेव्हा देखील डॉ. ह्यूम साहेबांचीच त्यांना मदत झाली. डॉ.ह्यूम यांनी ताबडतोब सातारा येथील आपल्या मुलीला पत्र लिहून अेक मोठा बंगला टिळकांना मिळवून दिला. ख्रिस्तायन लिहिण्यास त्यांनी अेक कारकूनही पाठविला. भिकूताअी व पेंडसे यांचा अपवाद करता डॉ. ह्यूम अितके निर्मळ व सक्रीय प्रेम टिळक दाम्पत्यावर कोणी केले नसेल. म्हणूनच टिळकांनी आपल्या मृत्यूपत्रात आपल्या आवडत्या व्यक्तींच्या यादीत आपल्या कुटुंबीयानंतर डॉ. ह्यूम साहेबांचाच प्रथम अुल्लेख केला आहे. याशिवाय नगरच्या अीश्वरविद्येच्या वर्गात स्वत:चे व डॉ. ह्यूमचे चित्र शेजारी शेजारी लावून डॉ. ह्यूमच्या चित्राखाली ` ह्याने ` व स्वत:च्या चित्राखाली ` ह्याला सांभाळिले ` असे शब्द लिहावे, अशीही सूचना त्यांनी केली आहे. टिळकांनी अितकी कृतज्ञता व्यक्त करावी, अशी पात्रता डॉ. ह्यूम यांच्या ठायी निश्चितपणे होती.

टिळकांच्या मृत्यूनंतरही टिळक कुटुम्बीयांची डॉ. ह्यूम साहेबांनी काळजी घेतली, हे देवदत्तांच्या निवेदनावरून दिसून येते. लक्ष्मीबाअी कराचीत रहात होत्या, त्यांना महाराष्ट्रात आणण्याचे प्रयत्न डॉ. ह्यूम यांनीच केले. त्यांनीच लक्ष्मीबाअींच्या सुनेला - रुथला नगरास सरकारी शाळेत काम लावून दिले. टिळक व टिळक कुटुम्बीयांचा त्यांनी अगदी मित्रत्वाने व मिशनरी

कळकळीने सांभाळ केला, म्हणून टिळकांचा संसार सुरळीत चालू शकला. ते अमेरिकेत वारल्यावर त्यांच्या अस्थी नगरच्या कबरस्थानात आणून ठेवण्यात आल्या. ह्या योगायोगाने टिळकांच्या जवळच ठेवण्यात आल्या, हा योगायोगही बोलकाच नाही का !

१. बालकवी -

त्र्यंबक बापूजी ठोंबरे उर्फ बालकवी यांच्या निरागस व निष्पाप बाळपणाच्या `स्मृतिचित्रां` त येणाऱ्या आठवणी अत्यंत हृद्य आहेत.

जळगावच्या कवि संमेलनातून बालकवींचा उदय झाला. केवळ सतरा वर्षे वयाच्या या कवीचे शीघ्रकवित्व तेथे जमलेल्या मंडळीस पहावयास मिळाले. टिळकांवर तर त्यांच्या काव्यशक्तीचा खूपच प्रभाव पडला व त्यांच्यासाठी आपण काहीतरी केले पाहिजे अशी तळमळ त्यांना लागून राहिली. त्यांनी कर्नल कीर्तिकरांशी पत्रव्यवहार सुरू केला. कर्नल कीर्तिकरच त्या कविसंमेलनाचे अध्यक्ष होते. त्यांनी ठोंबऱ्यांना महिना दहा रुपये देण्याचे कबूल केले. पण त्यांनी नगरास येऊन टिळकांच्या देखरेखीखाली रहावे, अशी अट घातली. त्याप्रमाणे ठोंबरे टिळकांच्या घरी येऊन दाखल झाले.

लक्ष्मीबाईंनी बालकवी आल्यावर त्यांना अहोजाहो म्हटले ते तेवढेच. त्यानंतर उभयतांतील परकेपणा नाहीसा झाला व त्या त्यांना अरेतुरे म्हणू लागल्या. आरंभी बालकवी उदास दिसायचे. कारण ते ख्रिस्ती माणसात येऊन पडले होते. ख्रिस्ती माणसे म्हणजे कोणी राक्षस किंवा भुते असावीत अशी त्यांची भावना होती. पण एक दोन दिवसातच त्यांचे टिळक कुटुंबा विषयीचे पूर्वग्रह दूर झाले व ते घरातील मुलाप्रमाणे वागू लागले.

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY

दत्तूशी व त्याच्या मित्रांशीही त्यांची छान गट्टी जमली. त्यांच्या निष्पाप स्वभावामुळेच ते टिळक कुटुंबाशी अितके अेकरुप होअू शकले.

बालकवी विनोदी व खेळकर स्वभावाचे होते. ते प्रथम घरी आले त्यावेळी लक्ष्मीबाअी झोपलेल्या होत्या. त्यांनी बालकवींना सांगितले, ' बाळ, ते कपाट अुघड नि त्यातून दूध काढून घे. ' बाळाने दूध घेअून कप तेथेच ठेवला. तेव्हा त्या म्हणाल्या, ' बाळ, तेवढा कप अुचलून ठेव बरं. '[११०] या प्रसंगावरुन बालकवी पुढे लक्ष्मीबाअींची चेष्टा करीत. ते म्हणत, ' लक्ष्मीबाअी, पंचम जॉर्ज तुमच्याकडे कधी आले तर त्यांनासुध्दा तुम्ही सांगाल की, बाळ, तेवढे फाटक लावून घे बरे येताना. '[१११] ठोंबऱ्यांचा हा विनोदी स्वभाव लक्ष्मीबाअींना फार आवडे.

कधीकधी मात्र ते चटकन रागाला यायचे. तसे ते तापट स्वभावाचेही होते. सखारामभाअुंनी त्यांना लक्ष्मीबाअींप्रमाणे अेकेरी नावाने हाका मारु लागले, हे त्यांना रुचले नाही. ते लक्ष्मीबाअींकडे तक्रार करु लागले. ~~त्यांना~~ लक्ष्मीबाअींनी त्यांची समजूत घालण्याचा प्रयत्न केला. पण बालकवी अैकेनात. लक्ष्मीबाअींनी अरेतुरे म्हटलेले त्यांना चाले कारण लक्ष्मीबाअींना ते आअीच्या ठिकाणी मानीत. टिळक सुध्दा ' अहो जाहो ' म्हणतात तिथे अितरांना अरेतुरे म्हणण्याचा काय अधिकार असा त्यांचा प्रश्न होता. शेवटी लक्ष्मीबाअींनीही त्यांना ' अहोजाहो ' म्हणाव्यास सुरुवात केल्यावर मात्र त्यांना ते आवडेना. ' लक्ष्मीबाअी, आता किती दिवस हे असे चालायचे ? मला अेकदा तुम्ही दिलेल्या नावाने हांक मारा पाहू ! '[११२] असे ते म्हणू लागले. लक्ष्मीबाअींनी ' चल मूर्खा ' म्हटल्यावर ते हसले व त्यांचे समाधान झाले. लक्ष्मीबाअींपासून त्यांना असा मातृसुखाचा लाभ होअी.

बालकवी टिळकांकडे रहावयास आल्यावर त्यांना विषमज्वर झाला होता. लक्ष्मीबाअींनी रात्र रात्र जागून त्यांची सेवा-शुश्रूषा केली व टिळकांनी पैसा खर्चला म्हणून ते बरे झाले. लक्ष्मीबाअींचा त्यांना फार ओढा होता. त्यांच्यासमोर ते मुलाप्रमाणे वागायचे पण टिळकासमोर ते गांभीर्याचा आव आणायचे.

कविता लिहिली की प्रथम ते लक्ष्मीबाअीना म्हणून दाखवीत. लक्ष्मीबाअींनी अैकण्यात थोडे दुर्लक्ष केले की ते रागाला यायचे व लक्ष्मीबाअीपुढे कविता फाडून टाकायचे. असा त्यांचा हळवा स्वभाव होता. अशावेळी दत्तू व बेबी त्यांना चिडवत -

" अरसिक कित्ती हा मेला
हा कविता फाडुन बाहिर गेला - [११३]

मग हसून पुन्हा ते कविता लिहून काढीत. मात्र त्यांना कविता फाडायचा बराच नाद होता. टिळकांच्या घरी येण्यापूर्वीची त्यांची बरीच कविता अशाप्रकारे नष्ट झाली आहे. त्यातील काही कविता ते पाठ म्हणून दाखवीत. त्यातील वर्णने चित्रप्राय असायची.

लक्ष्मीबाअींच्या मागे " गोष्ट सांगा " असा त्यांचा नेहमीच लकडा असायचा. गोष्ट अैकणे त्यांना फार आवडायचे. अेकदा लक्ष्मीबाअींच्या विहिणीने त्यांना अेक प्रदीर्घ कथा सांगून त्यांची चांगलीच खोड मोडली. सकाळी अुशीरा अुठल्यावर बालकवींनी आपली फजिती मनमोकळेपणे मान्य केली व लक्ष्मीबाअीपुढे साष्टांग नमस्कार घातला. " तुमची विहीण मोठी कादंबरीकर्ती व्हणार होती पण कोठे माशी शिंकली कोण जाणे "[११४] असा मिस्कील अभिप्रायही त्यांनी व्यक्त केला. आपल्या फजितीकडे खेळकरपणे पाहण्याची त्यांची वृत्ती येथे दिसून येते.

लक्ष्मीबाअींना काव्य करण्याची स्फूर्ती आली की त्या कवितेच्या ओळीच्या ओळी खडूने जमिनीवर अुतरवून ठेवायच्या. हा प्रकार बहुधा रात्री घडायचा. सकाळी बालकवी त्या ओळी कागदावर नोंदवून ठेवायचे. शेकडो पावणे-तीनशे ओळींची कविता बालकवींनी लिहून ठेवली. लक्ष्मीबाअींच्या प्रेमापोटीच त्यांनी हे श्रम घेतले.

बालकवींना दुसऱ्याची नक्कल करण्याची सवय होती. अेकदा लक्ष्मीबाअींच्या घरी आलेल्या रावसाहेबांची त्यांनी चांगलीच नक्कल केली. त्यावेळी लक्ष्मीबाअी त्यांच्यावर खूप रागावल्या. रात्री सर्वांनी बालकवींशी अबोला धरला. बालकवी फार खिन्न झाले तेव्हा लक्ष्मीबाअींनी त्यांना त्यांची चूक दाखवून दिली व पुन्हा असे करणार नाही म्हणून वचन देण्यास सांगितले. कोमल अंत:करणाच्या बालकवींना खूप वाअीट वाटले व त्यांच्या डोळ्यातून अश्रू ठिपकू लागले. त्यांनी लक्ष्मीबाअींच्या पायाची शपथ घेऊन कोणाही वडील माणसाचा अुपमर्द करणार नाही, असे वचन दिले. व तेव्हा लक्ष्मीबाअींनी त्यांना पोटाशी धरले. बालवृत्तीचे बालकवी पुन्हा हसू खेळू लागले. त्यानंतर त्यांनी कोणाचाही अुपमर्द केला नाही. या प्रसंगावर भाष्य करताना लक्ष्मीबाअी म्हणतात, ' ठोंबरे बालकवि होता, पण कवीपेक्षाही तो बाल अधिक होता. '[११५] त्यांचे हे विधान बालकवींच्या व्यक्तिमत्वाचा अचूक वेध घेणारे आहे.

लक्ष्मीबाअींनी अेक सामाजिक कादंबरी लिहावयास घेतली होती. त्यावर बालकवींनी लक्ष्मीबाअींच्या भाषेतच त्यासंबंधी जो अभिप्राय दिला आहे, तो त्यांच्या मार्मिक विनोदबुध्दीचे द्योतक आहे. बेबीच्या विनंतीनुसार बालकवींनी तिला पाठविलेले लांबलचक पत्र त्यांच्या ' प्रॅक्टिकल जोक ' चा अेक नमुनाच म्हणावे लागेल. कागदाला कागद चिकटवून लांबविलेले ते पत्र

बेबीच्या डोक्यापासून तिच्या पायापर्यंत पुरेल अितके मोठे होते.

टिळकांच्या घरात बालकवी नेहमी आनंदी, खेळाडू व आशावादी वृत्तीचे असायचे. याचे कारण टिळक कुटुम्बीयांचे त्यांना लाभत असलेले प्रेम व टिळकांच्या घराचे अुदार व मुक्त वातावरण हे होय. नगर सोडून गेल्यावर मात्र त्यांची ही वृत्ती बदले. नगरास ते परत आले की त्यांची बालवृत्तीही, परतायची.

टिळक कुटुम्बीयांचे आपणावर अितके प्रेम का याचे कधी कधी त्यांना कोडे पडायचे. अंतर्मुख होअून त्यावर ते विचार करायचे. आपण ख्रिस्ती व्हावे म्हणूनच या सर्वांचे आपणावर प्रेम आहे, असे त्यांच्या मनाने घेतले. लक्ष्मीबाअींनी त्यांचा हा समज दूर केला, तेव्हा ते पूर्ववत् वागू लागले.

बालकवींनी काही रक्कम लक्ष्मीबाअीजवळ ठेवली होती. टिळकांचे कर्ज फेडण्यासाठी लक्ष्मीबाअींनी बालकवींच्या संमतीने ती रक्कम वापरली. त्यानंतर बालकवी पुण्यास गेले. थोड्या दिवसांनी त्यांचा मामू बाबू आला व पैसे मागू लागला. त्यावेळी लक्ष्मीबाअीजवळ पैसे नसल्याने त्यांना बाबूला पैसे देता आले नाहीत. बाबू रागारागाने निघून गेला. बालकवींना हे कळल्यावर फार दु:ख झाले, कारण त्यांनी बाबूला मुळी पाठविलेच नव्हते. ते पुण्याहून रडत रडतच लक्ष्मीबाअींकडे आले. लक्ष्मीबाअींनी त्यांची समजूत घातली तरी बरेच दिवस हा विषय त्यांच्या मनातून गेला नाही. मनाने हळवे असल्यामुळे बालकवी चटकन दु:खी होत.

लक्ष्मीबाअींच्या घरात अनेक माणसे आली व गेली. पण बालकवींनी मात्र त्यांच्या हृदयातच घर केले होते. त्यांचा स्वभाव प्रेमळ, मनमिळावू, आनंदी, थट्टेखोर आणि थोडासा खोडकरही होता. मधून मधून ते भांडण करीत. पण त्यांच्यात कपट किंवा द्वेषाचा लवलेशही नव्हता. लक्ष्मीबाअींच्या घरी

त्यांचे बालपण सुरक्षित राहिले होते. ते घरी - आले की काही ना काही गमती करायचे. ` दंगामस्ती, झाडावर चढणे, घरावर उड्या मारणे, भांडणे, कागद घरभर करणे, कविता लिहिणे, त्या वाचून दाखविणे ... घरात सभा भरविणे, जादूचे खेळ करणे ... माझ्या लिहिण्याची चेष्टा करणे, रात्री अंगणात निजले म्हणजे चांदण्यांची मोजदाद करणे...`[११६] अशी या गमतींची लक्ष्मीबाअींनी यादीच दिली आहे.

बालकवींच्या शेवटच्या भेटीचे भावनोत्कट वर्णन लक्ष्मीबाअींनी केले आहे. टिळक व लक्ष्मीबाअी साता-याहून नगरला आल्यावर बालकवी त्यांना भेटण्यास धावतच आले. त्यावेळी ते आपल्या कुटुम्बियाबरोबर नगरास होते. टिळक व लक्ष्मीबाअींना कडकडून भेटल्यावर ते म्हणाले, " आज कितीक दिवसांनी मला माझे हितचिंतक पुन्हा भेटले. तुम्ही येथे नव्हता तेव्हा मला किती चुकल्या चुकल्यासारखे वाटत होते. "[११७] त्या रात्री टिळक व लक्ष्मीबाअी बालकवींच्या कडेच राहिले. दुस-या दिवशी स्टेशनवर टिळकांना निरोप देताना बालकवींच्या डोळ्यात अश्रू आले. लक्ष्मीबाअींनीही डोळ्यास पदर लावला. कधीही न रडणा-या टिळकांच्या डोळ्यातही अश्रू आले.

बालकवींना अपघाती मृत्यू येअील, हे अेका ज्योतिषाचे भविष्य काळाची चूक सोडता खरे ठरले. सर्वांना दु:खसागरात लोटून शान्तस्थळी काव्य करण्यासच जणू बालकवी निघून गेले. त्यांची आठवण येताच -

ये आता घे शेवटले हे अश्रू दोन पिऊन
पांखरा ये-शिल का परतुन ![११८]

ही टिळकांची काव्यपंक्ति लक्ष्मीबाअींना आठवायची. अेका निरागस, निष्पाप बालकवीचे बाल्य लक्ष्मीबाअींच्या घरी बागडत होते, त्याचा हृदयद्रावक अंत वाचकाच्या मनाला चुटपुट लावल्याखेरीज रहात नाही.

` स्मृतिचित्रे ` तील व्यक्तिचित्रणाचे परीक्षण -

वरील प्रमुख व्यक्तींखेरीज अितरही अनेक व्यक्ती ` स्मृतिचित्रें ` त आढळतात. पतीची लाथ खाअून तोंडात पाण्याशिवाय काही न घेता रामनामाचा जप करीत प्राण सोडणारी टिळकांची आअी, आणि आपल्या विहिणीने अशारीतीने कोटे प्राण सोडला हे मुद्दाम त्या गावी जाअून पाहणारी व पुढे त्याच आजाराने मृत्यू पावणारी लक्ष्मीबाअींची आअी, लक्ष्मीबाअींचा शोध घेण्यासाठी मुंबअीभर वणवण फिरत चाळीचाळीतून डोकावणारे गोविंदराव मामा, लक्ष्मीबाअींचे घरचे साधे जेवण घेताना आपण पंचपक्वान्ने खात आहोत असा आव आणणारा श्रीमंत कुटींचा मुलगा बापूसाहेब, ` येनकेन मार्गाने ` टिळकांना पुन्हा स्वधर्मात आणू अिच्छिणारे व ही अिच्छा पूर्ण झाली नाही तरी टिळकांवर अबाधित प्रेम करणारे नानासाहेब पेंडसे, ` आअी, तू लोकांच्या समोर रडू नकोस ` असे म्हणणारा दत्तू व टिळकांच्या घराचा आश्रय घेणारे अनेक त-हेवाअीक आश्रित - असा नानाविध लोकांनी ` स्मृतिचित्रां ` त गर्दी केली आहे. कुशल चित्रकाराने कुंचल्याच्या अेका फटकाऱ्याने अेखादे सुबक चित्र निर्माण करावे, त्याप्रमाणे लक्ष्मीबाअींनी या व्यक्तींचे चित्रण केले आहे.

लक्ष्मीबाअी व्यक्तींच्या स्वभावाचे, त्यांच्या गुणदोषांचे वर्णन या व्यक्तिचित्रणातून करतात. त्यांच्या व्यक्तिचित्रणाचे अेक वैशिष्ट्य म्हणजे त्या व्यक्तींच्या बहिरंगाचे चित्रण करण्यापेक्षा त्यांच्या कृती-अुक्तीतून त्यांचे स्वभाववैशिष्ट्य दाखविण्याचा प्रयत्न करतात. त्या आधारे त्या मनोदर्शन घडवितात पण मनोविश्लेषण करीत नाहीत. त्या व्यक्तीच्या मनात विशिष्ट प्रसंगी कोणती खळबळ माजली आहे, याचा मागोवाही त्या घेत नाहीत. टिळकांचे धर्मान्तर हा त्यांच्या व लक्ष्मीबाअींच्या जीवनातील स्मरप्रसंग.

पण यावेळीही स्वत:च्या [illegible] मनात कोणती वादळे अुठत आहेत, कोणते विचारतरंग अुमटत आहेत, याची नोंद त्या घेत नाहीत. स्वत:च्या मानसिक यातनांचे चित्रण त्यांच्या लिखाणात फारसे आढळत नाही. मनाला बसलेल्या या प्रचंड धक्क्यामुळे शरीरावर काय परिणाम झाले, - आपण खुरडत कशा चाललो, दिवसभर या घरातून त्या घरात येरझा-या कशा घातल्या, आपल्या डोळ्यातील पाणी कसे खळत नव्हते - याचेच त्या वर्णन करतात. याचे कारण त्यांच्या बहिर्मुख वृत्तीत असावे. त्यामुळे त्यांनी आपले सर्व लक्ष माणसाचे बोलणे व त्याची कृती यावरच केंद्रित केले. तथापि त्यामुळे त्या त्या व्यक्तींचे गुणदोष, स्वभाववैचित्र्ये त्यांच्या सूक्ष्म नजरेतून सुटत नाहीत. त्यांनी जी वर्णने केली आहेत, त्यावरून त्या त्या व्यक्तींचे स्वभावविशेष व त्या त्या प्रसंगातील त्यांची मन:स्थिती यांचे दर्शन झाल्या-खेरीज रहात नाही. आपण अेक लेखिका आहोत व आपणास काही वाङ्मयकृती घडवायची आहे, याची त्यांना अजिबात जाणीव नसल्याने त्यांनी केलेली स्वभावचित्रणे अगदी सहज, वास्तव, जिवंत व म्हणूनच अकृत्रिम आहेत. स्वभावचित्रणाचे `पुस्तकी` तंत्र त्यांना ठाअूक नव्हते व म्हणून कसलीही कृत्रिम बंधने त्यांच्या व्यक्तिचित्रणावर पडली नाहीत. त्यांचे स्वत:चे व्यक्तिमत्व खंबीर व स्वतंत्र असल्याने कोणत्याही दडपणाची बाधा त्यांच्या व्यक्तिचित्रणाला झालेली नाही. ज्या आपल्या प्रिय पतीचे चरित्र लिहिण्या-साठी त्यांनी या ग्रंथलेखनाचा प्रपंच केला, त्यांचे गुणदोष व विक्षिप्तपणा दाखविण्यास जेथे त्या कचरल्या नाहीत, तेथे अितर व्यक्तींचे गुणावगुण त्या कशा झाकून ठेवतील ! आपल्या सूक्ष्म निरीक्षण शक्तीने, तल्लख बुद्धिमत्तेने व विनोदबुद्धीने त्यांनी त्यांच्या सहवासात आलेल्या व्यक्तींचा वेध घेतला व `स्मृतिचित्रां` तून त्यांचे दर्शन घडविले. गंगाधर गाडगीळ यांनी

लक्ष्मीबाओींच्या व्यक्तिचित्रणातील कौशल्याचा यथार्थ गौरव केला आहे. ते म्हणतात, " लक्ष्मीबाओींनी नुसती व्यक्तिचित्रे रंगविली नाहीत तर या व्यक्तिचित्रांतून आणि त्यांच्या परस्पर संबंधांतून त्यांनी अनेकविध घाट निर्माण केले आहेत. फार थोर लेखकांनाच जे साधते ते त्यांनी साधले आहे." [११९] या परस्परसंबंधांतून निर्माण केलेल्या विविध घाटाव्दारे त्यांनी सर्व व्यक्तिमत्वांची खुलावट साधली आहे.

टिळक व लक्ष्मीबाओी खरेतर परस्परविरोधी स्वभावाच्या व्यक्ती. पण त्यांची व्यक्तिमत्वे परस्परपूरकही ठरली. टिळकांच्या संतापी स्वभावाला लक्ष्मीबाओींच्या विनोदाची जोड मिळाली, त्यांच्या अतिरेकी औदार्याला लक्ष्मीबाओींच्या व्यवहारदक्षतेचे कुंपण प्राप्त झाले, त्यांचा बंधमुक्त स्वभाव लक्ष्मीबाओींच्या अेकनिष्ठेच्या पाशात बध्द झाला व गंगाधर गाडगीळ म्हणतात त्याप्रमाणे, " ढगांवर सूर्यप्रकाश पडल्यावर जसे अिंद्रधनुष्य खुलते, तसेच टिळकांशी संबंध असल्यामुळे लक्ष्मीबाओींचे सारे व्यक्तिमत्व खुलले आणि दोघांच्या व्यक्तिमत्वाचे मिळून अेक भव्य अिंद्रधनुष्य निर्माण झाले. त्याचे अेक टोक हिमशिखरावर विसावले होते आणि दुसऱ्याला लक्ष्मीबाओींच्या संसाराचे शिंके टांगलेले होते." [१२०]

अितर व्यक्तिचित्रांचे परस्परसंबंधही असेच अर्थपूर्ण आहेत. टिळकांची सरळ स्वभावाची आअी व त्यांचे तऱ्हेवाओीक वडील, टिळकांअितकेच औदार्य व विक्षिप्तपणा लाभलेले महादेवभाअूजी, टिळकांच्या संसाराची काळजी घेअू अिच्छिणारे श्रीमंत आप्पासाहेब कुर्टी व डॉ. ह्यूम, टिळकांच्या मृत्यूने भ्रमिष्ट झालेले सखारामभाअूजी, कविहृदयाचे बालकवी व अल्पवयातच चुणचुणीतपणा दाखविणारे देवदत्त या सर्वांनी टिळकांभोवती फेर धरला आहे. लक्ष्मीबाओींच्या

व्यक्तिमत्वाची देखील अशीच घडावट झालेली आहे. ' स्मृतिचित्रे ' तील व्यक्तिरेखांनीच प्रामुख्याने या आत्मचरित्राला वाङ्मयीन महात्मता प्राप्त करून दिली आहे, असे म्हणण्यास प्रत्यवाय नाही. हे पाहिले की मराठीतील अेक थोर समीक्षक बा.सी. मर्ढेकर यांच्या विधानाची सत्यता पटते. ते म्हणतात, ' वाङ्मयीन महात्मतेत अभिप्रेत असलेल्या महात्मतेची खरी कल्पना यावयास ' स्मृतिचित्रे ' च्या अभ्यासाअितकी श्रेयस्कर दुसरी गोष्ट नाही .... ' स्मृतिचित्रे ' तील भावनागालिचा, त्यातील राग आणि प्रेम, सहानुभूती व तिरस्कार, अव्याजसरलता आणि प्रतिष्ठित सभ्यता, भोळा असमंजपणा आणि छद्मी व्यवहारकुशलता यांच्या निरनिराळ्या स्वरूपांची आणि परस्परसंबंधाची सूक्ष्म छाननी करण्याची सूचना दिल्याशिवाय राहवत नाही. ' [१२१]

' स्मृतिचित्रे ' तून प्रकट झालेली बालकवींची व्यक्तिरेखा ही अेक वैशिष्ट्यपूर्ण व्यक्तिरेखा आहे. अेका कवीच्या बालपणाचा तो अितिहास आहे. त्यांच्या काव्यनिर्मिती मागील पार्श्वभूमी जाणून घेण्याच्या दृष्टीने त्याला फार महत्व आहे. म्हणून त्यांनी केवळ बालकवींच्या आठवणीच लिहिल्या असत्या तरी वाङ्मयाच्या अभ्यासाच्या दृष्टीने ती कामगिरी मोलाची ठरली असती. बालकवींच्या व्यक्तिचित्रणाचा अभ्यास करताना अेक शंका मात्र मनात अुद्भवते. बालकवींचा अपघाती मृत्यू झाल्याचे सर्वांनाच माहित आहे. तथापि या अपघाती मृत्यूवर लक्ष्मीबाअी अधिक प्रकाश टाकतील, ही अपेक्षा मात्र पूर्ण होत नाही. ज्योतिषाचे ' भविष्य त्या वेळेस खोटे ठरले पण पुढे पांच वर्षांनी खरे ठरले ' [१२२] अेवढेच वास्तववादी थंडे विधान त्या करतात. हा मृत्यू रेल्वे अपघातात झाला, हे सुद्धा त्या सांगत नाहीत. बालकवींचा मृत्यू हा अपघात की आत्महत्या, असा विचार मनात येतो, पण त्याबद्दलही लक्ष्मीबाअी कांहीच

सांगत नाहीत. बालकवींच्या मृत्यूने त्यांची किती वैयक्तिक हानी झाली, हे त्या सांगतात, पण त्यांना मृत्यू कसा कोणत्या परिस्थितीत आला, याची मुळीच माहिती देत नाहीत. स्वत:च्या कौटुंबिक कक्षेपलीकडील व ' मी ' शी संबंधित नसलेल्या जीवनातील नाट्याविषयी त्यांच्या नाट्यात्मक प्रतिभेने कमालीचा संयम बाळगला आहे, असेच म्हणावे लागेल. आपल्या संसाराचे रामायण सांगताना अितर अुपाख्यानांना त्यांनी फारसे महत्व दिलेले नाही. त्यामुळे काही ठिकाणी वाचकांचे कुतूहल व जिज्ञासा यांचे समाधान होत नसले तरी त्यामुळे या वाङ्मयीन कृतीच्या लालित्याची कोठेच हानी होत नाही, हे मात्र कबूल केले पाहिजे.

लक्ष्मीबाअींनी जाणीवपूर्वक ही साहित्यकृती निर्माण केली नसली तरी कलेच्या निर्मितीचे कसब त्यांच्या ठिकाणी निसर्गदत्तच होते असे म्हणावे लागते. त्या अंत:करणपूर्वक, प्रांजलपणे लिहून लागल्या व कलात्मकता त्यांच्या लेखणीतून झरु लागली. यादृष्टीने क्रोचे या ग्रंथकाराच्या ' Technique either does not exist or coincides with art itself '[१२२] या विधानाचा प्रत्यय येतो. लक्ष्मीबाअींचे व्यक्तिचित्रणातील यश केवळ असामान्य आहे.

.....

* * *

वरील चर्चेच्या आधारे ` स्मृतिचित्रें ` तील व्यक्तिचित्रणासंबंधी काही महत्वाच्या बाबी लक्षात येतात. त्या सारांशरुपाने पुढीलप्रमाणे सांगता येतील-

लक्ष्मीबाई स्वत:विषयी कमालीच्या अलिप्ततेने व तटस्थतेने लिहितात. आत्मगौरव, आत्मगौरव, आत्मसमर्थन, आत्मप्रौढी या दोषापासून त्यांचे हे व्यक्तिचित्रण अलिप्त आहे, हे ` स्मृतिचित्रें ` चे अेक अुल्लेखनीय वैशिष्ट्य आहे. स्वत:च्या गुणदोषांची ही जाणीव त्यांच्या आत्मचरित्राचा वाङ्मयीन दर्जा अुंचावते. आपल्याबरोबर त्यांनी आपल्या अमस्वन पतीचे - रेव्ह.ना.वा. टिळकांचे - केलेले व्यक्तिचित्रणही अुल्लेखनीय आहे. स्वभावभिन्नता असली तरी कुठेही कटुता न आणता अत्यंत संयमाने त्यांनी आपल्या पतीच्या गुणदोषांचे मार्मिक चित्रण केले आहे. ज्या कालखंडामध्ये ` पती हाच परमेश्वर ` मानला जात होता, त्या कालखंडात त्या पतीचे दोष दाखवितात आणि तरीही पतीवरील त्यांचे अेकनिष्ठ प्रेम ढळत नाही, हे त्यांच्या पतीभक्तीचे व स्वतंत्र व्यक्तिमत्वाचेही द्योतक आहे. त्यांच्या जीवनाशी संबंधित असणाऱ्या सुष्ट-दुष्ट प्रकृतीच्या अनेक व्यक्तींचेही स्वभावरेखन त्यांनी मोठ्या मार्मिकपणे केले आहे. त्यातून व्यक्तिस्वभावाची वैशिष्ट्ये जशी प्रतीत होतात त्याचप्रमाणे लक्ष्मीबाई टिळकांच्या व्यावहारिकपणाचे, चातुर्याचे, सावधानतेचे व सूक्ष्म निरीक्षण शक्तीचे दर्शनही घडते. व्यक्तिचित्रण करताना लक्ष्मीबाई व्यक्तीच्या बहिरंगाचे चित्रण करण्यापेक्षा त्याच्या कृती - अुक्तीतून त्याची स्वभाववैशिष्ट्ये दाखविण्याचा प्रयत्न करतात. त्या आधारे त्या मनोदर्शन घडवितात, पण मनोविश्लेषण करीत नाहीत. स्व-जीवनाशी संबंधित नसणाऱ्या जीवनातील नाट्याविषयी त्यांच्या लेखणीने संयम पाळल्याचे आढळते. तथापि अेकंदरित व्यक्तिचित्रणात सहजता व अकृत्रिमता असल्याने त्यांनी रंगविलेली व्यक्तिचित्रे जिवंत व वास्तव वाटतात.

.....

## संदर्भ - सूचि


१. टिळक, लक्ष्मीबाओी - स्मृतिचित्रे - संपादक अशोक देवदत्त टिळक - नागरिक छापखाना, नाशीक. अभिनव आवृत्ती १९७३, भाग पहिला, पृष्ठ ६.

२. तत्रैव, पृष्ठ ८.

३. तत्रैव, पृष्ठ १०.

४. तत्रैव, पृष्ठ ७७.

५. तत्रैव, पृष्ठ ३६.

६. तत्रैव, पृष्ठ ४१.

७. तत्रैव, पृष्ठ ४६.

८. तत्रैव, पृष्ठ ४७.

९. तत्रैव, पृष्ठ ५६.

१०. तत्रैव, पृष्ठ १६१.

११. तत्रैव, पृष्ठ १६०.

१२. तत्रैव, भाग दुसरा, पृष्ठ ४.

१३. तत्रैव, भाग दुसरा, पृष्ठ २८.

१४. तत्रैव, भाग दुसरा, पृष्ठ ६६.

१५. तत्रैव, भाग पहिला, पृष्ठ १२३.

१६. तत्रैव, भाग दुसरा, पृष्ठ, ११.

१७. तत्रैव, भाग तिसरा, पृष्ठ ५.

१८. तत्रैव, भाग दुसरा, पृष्ठ २५.

१९. तत्रैव, भाग पहिला, पृष्ठ १०९.

२०. वैद्य, सरोजिनी - माती आणि मूर्ती. मॅजेस्टिक बुक स्टॉल मुंबई४, - प्रथमावृत्ति १९७५, पृष्ठ ९७.

२१. टिळक आुनि - भाग पहिला - पृष्ठ ८०.

२२. तत्रैव , पृष्ठ ८१.

२३. तत्रैव , पृष्ठ ४४.

२४. तत्रैव , भाग पहिला , पृष्ठ ७५.

२५. तत्रैव , भाग चौथा , पृष्ठ ३५.

२६. वैद्य आुनि , पृष्ठ ९८.

२७. गाडगीळ , गंगाधर - साहित्याचे मानदंड
पॉप्युलर प्रकाशन, मुंबआी, १९६२, पृष्ठ ८५.

२८. टिळक आुनि , भाग दुसरा , पृष्ठ ४९.

२९. तत्रैव , प्रस्तावना , पृष्ठ ९.

३० - अ - टिळक लक्ष्मीबाआी - स्मृतिचित्रे ( संक्षिप्त )
संपादक देवदत्त नारायण टिळक .
साहित्य अकादेमी तर्फे पॉप्युलर प्रकाशन, मुंबआी .
दुसरी आवृत्ती १९६८, प्रस्तावना , पृष्ठ १३.

३० - ब - टिळक अशोक देवदत्त - ' स्मृतिचित्रे आणि वस्तुस्थिती '
' लोकप्रभा ' १ मे १९८३ , पृष्ठ २.

३१. टिळक, लक्ष्मीबाआी आुनि, अभिनव आवृत्ती ,
भाग चौथा, पृष्ठ ११९.

३२. तत्रैव , भाग पहिला, पृष्ठ १७३.

३३. तत्रैव , भाग दुसरा, पृष्ठ १०८.

३४. तत्रैव , पृष्ठ २९.

३५. तत्रैव , भाग तिसरा, पृष्ठ १२१.

३६. तत्रैव , भाग दुसरा , पृष्ठ १२१.

३७. तत्रैव , भाग दुसरा , पृष्ठ ९३.

३८. तत्रैव , भाग चौथा, पृष्ठ १३२.

३९. तत्रैव.

४०. तत्रैव , पृष्ठ १३७.

४१. तत्रैव , भाग पहिला , पृष्ठ ८.

४२. तत्रैव , पृष्ठ १२.

४३. तत्रैव , पृष्ठ २२.

४४. तत्रैव , पृष्ठ २१.

४५. तत्रैव , पृष्ठ २७.

४६. तत्रैव , पृष्ठ ७९.

४७. तत्रैव , पृष्ठ १७७.

४८. तत्रैव , पृष्ठ ३५.

४९. तत्रैव , पृष्ठ १५४.

५०. तत्रैव .

५१. तत्रैव , भाग दुसरा, पृष्ठ ५१.

५२. तत्रैव , पृष्ठ ३६-३७.

५३. तत्रैव , पृष्ठ ४३-४४.

५४. तत्रैव , पृष्ठ ४४.

५५. तत्रैव , पृष्ठ ४९.

५६. तत्रैव , प्रस्तावना, पृष्ठ १२-१३.

५७. तत्रैव , भाग चौथा, पृष्ठ ११८.

५८. तत्रैव , भाग तिसरा, पृष्ठ ३७.

५९. तत्रैव , पृष्ठ ३६.

६०. तत्रैव , भाग पहिला, पृष्ठ ८६.

६१. तत्रैव , भाग दुसरा , पृष्ठ ६८.

६२. तत्रैव , भाग तिसरा, पृष्ठ २-३.

६३. तत्रैव , पृष्ठ २८.

६४. तत्रैव , भाग पहिला , पृष्ठ १०४.

६५. पाध्ये, प्रभाकर - ` स्मृतिचित्रां ` तील टिळकदर्शन
सत्यकथा जुलै ७६, पृष्ठ ३६.

६६. टिळक , लक्ष्मीबाआी अुनि, अभिनव आवृत्ती ,
भाग तिसरा, पृष्ठ ६६.

६७. तत्रैव , भाग दुसरा , पृष्ठ ५९.

६८. तत्रैव , भाग पहिला , पृष्ठ ९९.

६९. तत्रैव , भाग दुसरा , पृष्ठ १३३.

७०. पाध्ये अुनि , पृष्ठ ३६.

७१. टिळक, लक्ष्मीबाआी अुनि, भाग तिसरा, पृष्ठ १३७.

७२. तत्रैव , भाग दुसरा , पृष्ठ १२१.

७३. तत्रैव , भाग तिसरा , पृष्ठ ३१.

७४. तत्रैव , भाग पहिला, पृष्ठ १५९.

७५. गाडगीळ अुनि , पृष्ठ ७३.

७६. टिळक लक्ष्मीबाआी अुनि , भाग पहिला , पृष्ठ १८४.

७७. तत्रैव , भाग तिसरा , पृष्ठ १४४.

७८. तत्रैव , पृष्ठ १४०.

७९. तत्रैव , भाग पहिला , पृष्ठ १७७.

८०. तत्रैव , भाग तिसरा , पृष्ठ १४४.

८१. तत्रैव , पृष्ठ १५४.

८२. देशपांडे, अ.ना. आधुनिक मराठी वाङ्मयाचा अितिहास
भाग दुसरा - व्हीनस प्रकाशन पुणे २ ,
आवृत्ती पहिली , पृष्ठ ५५६.

८३. जोशी, अ.म. - प्रदक्षिणा - ` चरित्रवाङ्‌मय `
कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे, ३०.
सहावी आवृत्ती १९७६ , पृष्ठ २९९.

८४. टिळक , लक्ष्मीबाई अनि, अभिनव आवृत्ती ,
भाग पहिला , पृष्ठ ३.

८५. तत्रैव , पृष्ठ ४.

८६. तत्रैव , पृष्ठ ६.

८७. तत्रैव , पृष्ठ ११.

८८. तत्रैव , पृष्ठ ५७.

८९. तत्रैव , भाग दुसरा , पृष्ठ २७.

९०. तत्रैव , पृष्ठ २९.

९१. तत्रैव , पृष्ठ ५२.

९२. तत्रैव , पृष्ठ १०५.

९३. तत्रैव , पृष्ठ १०६.

९४. तत्रैव , पृष्ठ १०८.

९५. तत्रैव , भाग पहिला , पृष्ठ १६.

९६. तत्रैव , पृष्ठ २४.

९७. तत्रैव , पृष्ठ १०५.

९८. तत्रैव .

९९. तत्रैव , पृष्ठ १०६.

१००. तत्रैव , पृष्ठ १०४.

१०१. तत्रैव.

१०२. तत्रैव , पृष्ठ १९.

१०३. तत्रैव , भाग तिसरा , पृष्ठ १३.

१०४. तत्रैव , भाग चौथा , पृष्ठ ३८.

१०५. तत्रैव , भाग दुसरा , पृष्ठ ७६.

१०६. तत्रैव , पृष्ठ ९९.

१०७. तत्रैव , पृष्ठ १००.

१०८. तत्रैव , पृष्ठ १०१.

१०९. तत्रैव , पृष्ठ १२७.

११०. तत्रैव , ~~पृष्ठ-१२~~ भाग तिसरा, पृष्ठ २२.

१११. तत्रैव .

११२. तत्रैव , पृष्ठ २३.

११३. तत्रैव , पृष्ठ २४.

११४. तत्रैव , पृष्ठ २६.

११५. तत्रैव , पृष्ठ ५३.

११६. तत्रैव , पृष्ठ ११६.

११७. तत्रैव , पृष्ठ ११९.

११८. तत्रैव , पृष्ठ १२०.

११९. गाडगीळ गंगाधर - साहित्याचे मानदंड ,
पॉप्युलर प्रकाशन , मुंबई १९६२ , पृष्ठ ८०.

१२०. तत्रैव , पृष्ठ ८१.

१२१. मर्ढेकर , बा.सी. - सौंदर्य आणि साहित्य
मौज प्रकाशन , मुंबई ४.
तिसरी आवृत्ती, १९७५, पृष्ठ १६९.

१२२. टिळक, लक्ष्मीबाअी अुनि , अभिनव आवृत्ती ,
भाग तिसरा, पृष्ठ ८४.

१२३. फडके, ना.सी. - प्रतिभासाधन ,
देशमुख आणि कंपनी, पुणे २,
सातवी आवृत्ती १९६० , पृष्ठ २३७.

.......